# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ५ वे अंक ३४ मंगळवार दि.०५ ऑगस्ट २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## मुलींची अंतर्वस्त्र तपासल्याचं नेमकं प्रकरण काय? जाणून घ्या, प्रकाश आंबेडकर काय म्हणाले

पुणे शहरातल्या कोथरूड परिसरात छत्रपती संभाजीनगरमधील एका प्रकरणाच्या तपासात पोलिसांनी तीन मुलींसोबत पोलिसांनी जातीवाचक शिवीगाळ, मारहाण आणि लैंगिक छळ केल्याचा मोठा आरोप करण्यात आला आहे. यानंतर आता वंचित बहुजन आघाडीतर्फे आंदोलन केले जात असून पोलिसांनी घरात घुसून बाथरुम आणि बेडरूममध्येही तपासणी केली. इतकेच नव्हे, तर त्यांच्या इनरवेअरचीही तपासणी केल्याचा गंभीर आरोप तरुणीने केला आहे. या प्रकरणानंतर प्रकाश आंबेडकर यांनी सोशल मीडियावर एक पोस्ट टाकली असून कदम नावाच्या पोलिस अधिकाऱ्यांसोबत त्यांचा संवादाचा व्हिडिओही त्यांनी पोस्ट केला आहे. मुलगी २५ वर्षांची आहे, हे सगळे कुणाच्या तरी घरात घुसतात. कोणत्या कायद्याखाली ते घुसतात, पोलिसांना लायसन्स तर दिलेले नाही ना..असा सवाल कदम या अधिकाऱ्यांना सवाल केला. प्रकाश आंबेडकरांचा अधिकाऱ्यांशी काय झाला फोनवर संवाद..?

यावेळी फोनवर प्रकाश आंबेडकर संबंधित पोलिस अधिकाऱ्यांना म्हणाले, एफआयआर नोंदवायला हवा, चौकशी तर होत राहील. दोन दिवस कशाला तत्काळ एफआयआर व्हायला हवा. नाहीतर मी त्यांना सांगेल की धरणे देऊन बसेल. तुम्ही विनंती करु नका.. कायदा कायदा आहे, गुन्हा नोंदवून घ्या, चौकशी होत राहील. तुमच्या चौकशीवरुन जो निष्कर्ष येईल त्यावरच तुम्ही कारवाई कराल ना..एफआयआर नोंदवायला सांगा.

अधिकारी एक-दोन दिवसांत एफआयआर दाखल करुन घेऊ, असे सांगत होता. त्यावर प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले की, एक लक्षात घ्या कदम.... ती मुलगी २५ वर्षांची आहे. कुठलातरी पोलीस औरंगाबादमधून येतो आणि हे सगळ्या कोणाच्यातरी घरात घुसतात. हे पोलीस कोणत्या कायद्याखाली मुलींच्या घरात घुसतात?, असा सवाल प्रकाश आंबेडकर यांनी विचारला.




प्रकाश आंबेडकरांनी दिली प्रकरणाची माहिती

सोशल मीडियावर पोस्ट करुन प्रकाश आंबेडकर यांनी या प्रकरणासंदर्भात आपली भूमिका स्पष्ट केली आणि पोलिसांना आंदोलनाचा इशाराही दिला आहे. छत्रपती संभाजीनगर ते पुणे अशी किनार असलेल्या या प्रकरणाबद्दल प्रकाश आंबेडकरांनी सांगितलं की, औरंगाबादमधील एक विवाहित महिला पतीच्या त्रासाला कंटाळून पुण्यात आली होती. तिला मदत करण्यासाठी पुण्यातील तीन सामाजिक कार्यकर्त्या महिला पुढे आल्या. त्यांनी तिला 'वन स्टॉप सखी सेंटर'मध्ये दाखल केलं आणि तिला स्वावलंबी होण्यासाठी मदत केली. 'त्या' महिलेचा नातेवाईक निवृत्त पोलिस अधिकारी प्रकाश आंबेडकरांनी आपल्या पोस्टमध्ये पुढे हेही म्हटलं की, या महिलेच्या नातेवाईकांपैकी एक व्यक्ती औरंगाबादमध्ये निवृत्त पोलिस अधिकारी असल्याचे सांगितले जाते. त्यांनी आपल्या पदाचा गैरवापर करत पुणे पोलिसांची मदत घेतली, असा आरोप आहे. यानंतर कोथरूड पोलिसांनी कोणत्याही वॉरंटशिवाय या तीन महिलांच्या घरी जाऊन त्यांना ताब्यात घेतलं आणि पोलीस ठाण्यात नेलं. जातीय अन् स्त्रीद्वेषी शिविगाळ..! प्रकाश आंबेडकरांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले की, पुणे पोलिस त्या आरोपी पोलिस कर्मचाऱ्यांविरुद्ध एफआयआर दाखल करण्यास टाळाटाळ करत आहेत, ज्यांनी मध्यरात्री तीन महिला तक्रारदाराच्या घरात घुसून त्यांना जातीय आणि स्त्रीद्वेषी शिवीगाळ केली. मी पुणे शहराच्या पोलीस उपायुक्तांशी संपर्क साधून त्यांना तात्काळ एफआयआर दाखल करण्याचे निर्देश दिले. मी त्यांना स्पष्ट सांगितले की, सर्वोच्च न्यायालयाने असे म्हटले आहे की पोलिसांना मिळालेल्या माहितीत जर कुठल्याही संज्ञेय गुन्ह्याचा उल्लेख होत असेल, तर एफआयआर नोंदवणे बंधनकारक आहे. मी ठामपणे सांगितले, कायदा म्हणजे कायदाच असतो!

'वंचित'कडून आंदोलन वंचित बहुजन आघाडी पुणे जिल्हा समित्यांनी एफआयआर नोंदवण्यास टाळाटाळ करणाऱ्या पोलिसांविरोधात आंदोलन केले होते. जर पोलिसांनी यानंतरही एफआयआर दाखल केला नाही, तर आम्ही मोठ्या संख्येने एसपी कार्यालयासमोर एकत्र येऊन तीव्र आंदोलन करू, असा इशारा वंचिततर्फे देण्यात आला आहे. पोलिसांना एवढी भीती कशाची? यावेळी पुणे पोलीस आयुक्तालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना अजूनही अट्रोसिटी कायद्याचे महत्त्व, पीडित महिलांचा त्रास समजत नाहीये. गेल्या १५ तासांपासून पीडित तरुणी पोलीस आयुक्तालयात एफआयआर नोंदवावी म्हणून लढताय. तरीसुद्धा पोलिस प्रशासन गुन्हा नोंदवायला तयार नाही. पोलिसांना एवढी भीती कशाची? पोलिस आरोपींना पाठीशी का घालताय? सर्वोच्च न्यायालयाचे स्पष्ट आदेश असतांना पुणे पोलीस आरोपींना पाठीशी का घालताय? आंदोलनकर्त्यांनी प्रश्न विचारल्यावर पळ काढणे, हे पुणे पोलिसांचे अपयश आहे! जोपर्यंत पोलिसांवर गुन्हे दाखल होत नाहीत, तोपर्यंत वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते पोलिस आयुक्तालय सोडणार नाही, असेही प्रकाश आंबेडकरांनी एक्सवरील पोस्टद्वारे इशारा दिला आहे.


## लातूर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या वाटचालीत विविध कार्यकारी संस्थांचे मोठे योगदान




केला जातो. यामध्ये लातूर जिल्ह्यातील विविध कार्यकारी सोसायट्यांचे योगदान लाख मोलाचे असल्याचे गौरउदगार माजी आमदार तथा लातूर जिल्हा बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांनी काढले. दि महाराष्ट्र बँक्स असोसिएशन द्वारा दिला जाणारा कै.वेकूंठभाई मेहता उत्कृष्ट बँक पुरस्कार व सहकार क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल धिरज विलासराव देशमुख यांना पुरस्कार प्राप्त झाला या बद्दल औसा तालुक्यातील विविध कार्यकारी संस्था चेअरमन यांच्या वतीने आयोजित सत्कार कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी जिल्हा बँक संचालिका स्वयंप्रभा पाटील,माजी जिप सदस्य नारायण लोखंडे,संत शिरोमणी कारखाना चेअरमन शाम भोसले,व्हा चेअरमन सचिन पाटील,माजी चेअरमन गणपतराव बाजूळगे, जिल्हा बँक उपाध्यक्ष प्रमोद जाधव,मांजरा कारखाना व्हा चेअरमन अशोकराव काळे,रेणा कारखाना व्हा चेअरमन प्रविण पाटील, सदाशिव कदम,बाबासाहेब गायकवाड,पृथ्वीराज सिरसाठ,रघुनाथ शिंदे, आदींची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना माजी आमदार धिरज विलासराव देशमुख म्हणाले की, लातूर जिल्हा बँक ही आपल्या जिल्ह्यातील शेतक-यांचा मोठा आधार असून शेतकरी आहे म्हणून देश आहे त्यामुळे शेतकरी हिताचे अनेक निर्णय घेवून ते यशस्वी पणे राबवले त्यामुळे आपल्या भागातील शेतक-यांच्या जिवनात आर्थिक परिवर्तन घडले आहे असे त्यांनी सांगितले. यावेळी सर्व विविध कार्यकारी सोसायटी चेअरमन व सदस्यांनी माजी आमदार धिरज विलासराव देशमुख यांचा सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमासा विविध संस्था चेअरमन दत्तकुमार शिंदे,वाघंबर कांबळे,गोरख सावंत,दिनकर मेढकर,गुणवंत कदम,धनराज साळुंखे,दिलीप पाटील,अशोक जंगाले,गुणवंत करडे,पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पहाटे ४ वाजल्यापासून रुग्णांना तपासायचे, फक्त २ रुपये फी घ्यायचे, गरीबांच्या डॉक्टरचं निधन, मुख्यमंत्री म्हणाले.



केरळमधून एक दुखद बातमी पुढे येतंय. केरळमधील कन्नूर येथील दोन रुपयांचे डॉक्टर यांचे निधन झालंय. त्यांनी आयुष्यभर रूग्णांवर फक्त दोन रूपयांमध्ये उपचार केले. दोन रूपये त्यांची फिस असतं.

होतकरू आणि गरीब रूग्णांना ते फ्रीमध्ये गोळ्या देखील देत. डॉ. ए.के रायारू गोपाल यांचे शनिवारी केरळमधील कन्नूर येथे निधन झाले. त्यांच्या निधनाची बातमी कळताच लोकांनी त्यांच्य घराबाहेर गर्दी केली. डॉ. ए.के रायारू गोपाल हे ८० वर्षांचे होते आणि त्यांचे वृद्धापकाळाने निधन झाले.

विशेष म्हणजे त्यांचे दोन रूपये फिस असणारे रूग्णालय हे २०२४ पर्यंत सुरू होते. त्यानंतर तब्येतीमुळे रूग्णालय बंद केले. निःस्वार्थ सेवेचा वारसा मागे सोडत त्यांनी असंख्य लोकांना प्रेरणा दिली आहे. कन्नूर येथील त्यांच्या निवासस्थानी एक छोटेसे क्लिनिक ते चालवत होते. विशेष म्हणजे ते मागच्या पाच दशकांपासून गरीब लोकांना सेवा देण्याचे काम करत होते. डॉ. ए.के रायारू गोपाल यांचे नाव लोकांनीच दोन रुपयांचे डॉक्टर असे ठेवले होते.

डॉ. ए.के रायारू गोपाल यांच्या रूग्णालयाची खास गोष्ट म्हणजे सकाळी ४ वाजताच हे रूग्णालय सुरू होत. त्यानंतर दुपारी ४ पर्यंत सुरू असायचे. डॉ. गोपाल हे दिवसभरात ३०० पेक्षाही अधिक रूग्णांची तपासणी करत. ज्या लोकांकडे औषधे घेण्यासाठी पैसे नसत त्यांना ते फ्रीमध्येच औषधे देऊन घरी पाठवत. आजारी असल्यास शालेय मुले त्यांच्याकडे दाखवून मग शाळेत जात होती.

केरळचे मुख्यमंत्री पिनाराई विजयन यांनी डॉ. गोपाल यांच्या निधनानंतर सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर करत दु:ख व्यक्त केलंय. केरळचे मुख्यमंत्री पिनाराई विजयन यांनी डॉ. गोपाल यांचे वर्णन लोकांचे डॉक्टर असे केले आणि म्हटले की, इतक्या कमी शुल्कात सेवा देण्याची त्यांची तयारी गरीब रुग्णांसाठी मोठ्या प्रमाणात दिलासा देणारी होती. डॉ. गोपाल यांच्या निधनाची बातमी कळताच लोक त्यांच्या घरी मोठ्या संख्येने पोहोचले होते. डॉ. गोपाल यांच्या निधनानंतर मोठा आधार गेल्याची भावना लोकांमध्ये आहे.

## साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त बोरीसावरगाव येथे रक्तदान शिबिर



केज/प्रतिनिधी तालुक्यातील बोरीसावरगाव येथे साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिर घेण्यात आले या सामाजिक उपक्रमात अनेक रक्तदात्यांनी रक्तदान केले. कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती बोरीसारगाव चे सरपंच वैजनाथ देशमुख,उपसरपंच बाळकृष्ण यादव,माजी उपसरपंच अंगद पोळ,ग्राम सदस्य अक्षय पोळ, ग्राम सदस्य विनोद पोळ, ग्राम सदस्य गंगाधर पोळ,योगेश देशमुख, ज्योतीभाऊ मुळे ,राजपाल काकडे रक्तदान शिबिर आयोजन वीरफकीराग्रुपने केले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष सुरज पोळ,उपाध्यक्ष दत्ता पोळ,सचिव सत्यजित पोळ,खजिनदार साई पोळ ,कार्यक्रमाचे सल्लागार अंगद पोळ,अजय पोळ,गोविंदा पोळ,दत्ता पोळ,नितीन पोळ, प्रकाश पोळ,आकाश पोळ, राहुल पोळ,राहुल पोळ, बालाजी वाघमारे, आकाश पोळ, कुलदीप पोळ, कुणाल पौळ आदींनी केले. सामाजिक उपक्रमाने जयंती साजरी केली.

## लातूर कॉँग्रेसचे नुतन जिल्हाध्यक्ष अभय साळुंके यांचा पदग्रहण सोहळा उत्साहात संपन्न



लातूर :- श्रावण महिन्याच्या दुसऱ्या सोमवारच्या शुभमुहूर्तावर लातूर कॉँग्रेसचे नुतन जिल्हाध्यक्ष अभय साळुंके यांचा कॉँग्रेस भवन लातूर येथे जिल्हाध्यक्ष पदाचा पदग्रहण सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या सूचनेनुसार पदभार कॉँग्रेस पक्षाचे मावळते जिल्हाध्यक्ष श्रीशैल उटगे यांच्या हस्ते नुतन जिल्हाध्यक्ष अभय साळुंके यांचा सत्कार करण्यात आला. तसेच त्यांच्या हस्ते प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत लातूर कॉँग्रेस पक्ष कार्यालयाचा पदभार अभय साळुंके यांनी यावेळी स्विकारला.

याप्रसंगी लातूर शहर जिल्हा कॉँग्रेस कमिटीचे अध्यक्ष ड.किरण जाधव,ड.समद पटेल,कल्याण पाटील,एन. आर.पाटील,डॉ.दिनेश नवगिरे,ड.प्रमोद जाधव,ड. बाबासाहेब गायकवाड, सुभाष घोडके,इमरान सय्यद, प्रा.प्रवीण कांबळे,प्रवीण सूर्यवंशी,मारोती पांडे, आबासाहेब पाटील उजेडकर,ड. अजित बेळकोणे आदी उपस्थित होते. नुकतेच कॉँग्रेसचे लातूर ग्रामीण जिल्हाध्यक्ष म्हणून अभय साळुंके यांची पक्ष श्रेष्ठीकडून नियुक्ती करण्यात आली असून जिल्हाध्यक्ष म्हणून वर्णी लागताच त्यांनी तात्काळ पक्ष कार्याच्या कामाला सुरुवात करावी अशा सूचना राज्याचे माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी दिल्यानंतर सोमवार दि ४ ऑगस्ट रोजी लातूर शहरातील कॉँग्रेस भवन कार्यालयात छोटेखानी पदग्रहण सोहळ्याचे आयोजन करुन अधिकृतरीत्या लातूर कॉँग्रेस जिल्हाध्यक्ष म्हणून अभय साळुंके यांच्याकडे रितसर पदभार सोपविण्यात आला. यावेळी प्रदेश कार्यकारिणीत सचिव म्हणून निवड झालेले श्रीशैल उटगे,ड.समद पटेल,कल्याण पाटील, एन.आर.पाटील,डॉ.दिनेश नवगिरेयांचाही जिल्हा कॉँग्रेस कमिटीच्या वतीने सत्कार करण्यात आला. गतवैभव मिळवून देण्याचा संकल्प पदग्रहण सोहळ्यानंतर सत्काराला उत्तर देताना नुतन जिल्हाध्यक्ष अभय साळुंके म्हणाले कि,त्यागाचा, समर्पणाचा आणि स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास असलेल्या व भारताचे भवितव्य घडवलेल्या भारतीय राष्ट्रीय कॉँग्रेस पक्षाचा लातूर जिल्हाध्यक्ष म्हणून पक्ष श्रेष्ठीनी माझ्यावर विश्वास दाखवल्याबद्दल प्रांताध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ,सहकार महर्षी दिलीपराव देशमुख, माजीमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख व कॉँग्रेसच्या राज्य व केंद्रीय पातळीवरील नेत्यांचे आभार मानत ज्या विश्वासाने माझ्यावर जबाबदारी सोपविण्यात आली तो विश्वास मी माझ्या कामाच्या माध्यमातून सार्थ करुन दाखवेन तसेच जिल्ह्यातील कॉँग्रेसला गतवैभव मिळवून दिल्याशिवाय स्वस्त बसणार नाही असा विश्वास नूतन जिल्हाध्यक्ष अभय साळुंके यांनी यावेळी व्यक्त केला. जिल्ह्यातील प्रत्येक पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या कामाचे मुल्यमापन करुन त्यांना योग्य सन्मान मिळवून देण्याचे काम करण्याबरोबरच प्रत्येक पदाधिकारी व कार्यकर्त्यांला पक्षात सन्मानपूर्वक स्थान निर्माण करुन देणार,आगामी जिल्हा परिषद, महानगरपालिका,नगर पंचायत,नगर पालिका,पंचायत समिती तसेच सर्व स्थानिक स्वराज्य संस्थावर कांग्रेस पक्षाचा झेंडा फडकविण्याचा संकल्प त्यांनी यावेळी बोलून दाखविली. तद्नंतर जिल्हाभरातून आलेल्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी अभय साळुंके यांचा सत्कार करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. यावेळी प्रदेश कॉँग्रेस कमिटीचे नूतन सचिव श्रीशैल उटगे व लातूर शहर जिल्हा कॉँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष किरण जाधव यांनीही अभय साळुंके यांना शुभेच्छा देत आपले मनोगत व्यक्त केले.

यावेळी ड.प्रमोद जाधव,सुभाष घोडके, सहदेव मस्के,मारुती पांडे,ड.बाबासाहेब गायकवाड,प्रा.प्रवीण कांबळे,सुरेश चव्हाण,सचिन बंडापल्ले,ड.फारुख शेख,ड. देविदास बोरुळे पाटील,सोनू डगवाले,युनूस मोमीन,आयुब मणियार, बाळासाहेब देशमुख,गोविंद बोराडे,सुधाकर पाटील, पंकज शेळके,विठ्ठल पाटील,ड. नारायण सोमवंशी,अजित निंबाळकर,प्रमोद जोशी,डॉ.गजेंद्र तरंगे,व्यंकटेश पुरी,अमित जाधव,ड. विजय गायकवाड,कलीम शेख,बालाजी साळुंके,महेश काळे, तबरेज तांबोळी,हमीद बागवान,अजित नाईकवाडे, संजय ओहळ,आसिफ बागवान,सिकंदर पटेल,मुकेश राजमाने,अविनाश बट्टेवार,विकास वाघमारे,बालाजी साळुंखे,विजय टाकेकर,पवन बनसोडे,राजू गवळी, अनिल पाटील,इब्राहिम शेख,रमेश सूर्यवंशी,सुलेखा कारेपूरकर,शीतल मोरे,करुणा शिंदे,भाऊसाहेब भडीकर,पवन गायकवाड,विजय टाकेकर,खाजापाशा शेख,जहीर शेख,युनूस शेख,विष्णुदास धायगुडे, अभिषेक पतंगे,अमोल गायकवाड,धनराज गायकवाड, अक्षय मुरुळे,पिराजी साठे,बालाजी गवळी,गिरीश ब्याळे,सत्यवान कांबळे,कुणाल वागज,पवनकुमार गायकवाड,फारूक शेख,नितीन कांबळे,ड गणेश कांबळे,युसूफ सय्यद,आसिफ मणियार,करीम तांबोळी,बब्रुवान गायकवाड, शकील पटेल,महेश देशमुख,प्रा.रमेश मदरसे,धनाजी चांदूर,अपराजित मरगणे,विकास पाटील,मदन बिरादार,श्रीकांत साळुंके, अमोल नवटके,माधवराव पाटील आदीसह जिल्ह्यातील कॉँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रवीण सूर्यवंशी यांनी केले तर शेवटी कार्यक्रमास उपस्थित सर्वांचे आभार इमरान सय्यद यांनी मानले.

# संपादकीय

## अत्याचारी प्रज्वलला शिक्षा

जनता दल (धर्मनिरपेक्ष) पक्षाचा माजी खासदार प्रज्वल रेवण्णा याला बंगळूरमधील विशेष न्यायालयाने बलात्कार प्रकरणात जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. यामुळे अतिमहत्त्वाच्या व्यक्तीही कायद्याच्या चौकटीबाहेर नाहीत, हेच पुन्हा अधोरेखित झाले आहे. प्रज्वल हा माजी पंतप्रधान एच. डी. देवेगौडा यांचा नातू आणि माजी मुख्यमंत्री व विद्यमान केंद्रीय अवजड उद्योगमंत्री एच. डी. कुमारस्वामी यांचा पुतण्या असून, त्याला पक्षातून निलंबित केले आहे. बंगळूरमधील विशेष न्यायालयाचे न्यायाधीश संतोष भट यांनी ३४ वर्षीय प्रज्वलला जन्मठेप सुनावतानाच १० लाख रुपयांचा दंडही ठोठावला. त्याच्या विरोधात लैंगिक छळ आणि बलात्काराचे चार खटले दाखल केले असून, त्यापैकी एका खटल्यात विशेष न्यायालयाने त्याला दोषी ठरवले होते. कर्नाटकमधील हासन जिल्ह्यातील होलेनारसीपुरा येथे देवेगौडा यांच्या कुटुंबीयांचे फार्म हाऊस आहे. तिथे काम करणार्या एका ४८ वर्षीय महिलेने २०२१ मध्ये प्रज्वलने आपल्यावर दोनवेळा बलात्कार केल्याची, तसेच ते कृत्य मोबाईल फोनवर चित्रित केल्याची तक्रार दाखल केली होती.

सरकारी पक्षाने त्याला जन्मठेपेचीच शिक्षा द्यावी, अशी मागणी केली होती, तर आपण कोणताही गुन्हा केलेला नाही, असा युक्तिवाद प्रज्वलच्या वतीने करण्यात आला. राजकारणात वेगाने भरभराट झाली, हीच केवळ चूक आहे, असे प्रज्वलच्या वतीने न्यायालयात सांगण्यात आले; मात्र त्याच्या राजकीय विकासाशी सामान्यांना काहीही देणेघेणे नाही. त्याने नीच कृत्य केले आहे. म्हणूनच त्याला जन्मठेप ठोठावली असून, हे योग्यच झाले. प्रज्वलने सातत्याने त्याच्याकडे काम करणार्या स्त्रीच्या परिस्थितीचा व असाह्यतेचा लाभ उठवून तिच्यावर वारंवार अत्याचार केले. शिवाय या घटनेबद्दल कोणालाही सांगितल्यास व्हिडीओ लीक करण्याची धमकी दिली होती. मुळात त्याने पन्नासहून अधिक स्त्रियांवर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे. तसेच त्याने शूट केलेल्या असंख्य आक्षेपार्ह व्हिडीओ क्लिप्स समाजमाध्यमांवर आलेल्या आहेत. एखाद्या स्त्रीवर वर्चस्व गाजवण्याच्या स्थितीत असता, तेव्हा त्याचा फायदा उठवून तिच्यावर अत्याचार केल्यास कायद्यातील ३७६-२ के हे कलम लागू होते. प्रज्वलवर ते लावले आहे. त्याची ही प्रकरणे बाहेर आल्यानंतर तो जर्मनीला पळाला होता. तेथून तो परतल्यानंतर त्याला अटक करण्यात आली. निवडणुकांच्या अगोदरच त्याचे व्हिडीओ व्हायरल झाल्यामुळे अर्थातच लोकसभा निवडणुकीत त्याचा पराभव झाला. जनतेनेही त्याच्या पापाची त्याला सजा दिली.

दि. २ मे २०२४ला प्रज्वल विरुद्धच्या खटल्याची सुनावणी सुरू झाली. डिसेंबर २०२४ मध्ये आरोपपत्र सादर करण्यात आले. ११३ साक्षीदारांनी साक्ष दिली. दि. ३० एप्रिल २०२५ रोजी आरोप निश्चित करण्यात आले. साधारण सव्वा वर्षात सुनावणी पूर्ण होऊन प्रज्वलला शिक्षा दिली आहे. इतर अनेक प्रकरणांच्या मानाने या खटल्याचा वेगाने निपटारा केला आहे, हे अभिनंदनीय आहे. प्रज्वलच्या माजी वाहनचालकाने त्याच्या विरुद्ध साक्ष दिली. त्याच्या फोनमध्ये २८ फोटो आणि ४० ते ५० अश्लील व्हिडीओज पाहिले, अशी साक्ष त्याने दिली होती. त्याने घरी काम करणार्या स्वयंपाकिणीवर आणि तिच्या मुलीवरही अत्याचार केल्याचा आरोप आहे. तसेच जेडीएसच्या माजी जिल्हा पंचायत कार्यकर्त्याला मारहाण करणे, धमक्या देणे असेही गुन्हे त्याच्यावर दाखल आहेत. या खटल्यांची सुनावणी अद्याप व्हायची आहे.

लोकशाही, धर्मनिरपेक्षता, उदारमतवाद, महिला विकास अशा विषयांवर लांबलचक भाषणे ठोकणार्या देवेगौडा यांच्या घराण्यात प्रज्वलसारखा कुलदीपक वेगळेच प्रताप करत होता. देवेगौडा व कुमारस्वामी यांना याची कल्पनाच नसेल, तर ते आश्चर्यकारक आहे. त्याचे वडील एच. डी. रेवण्णा हेही जेडीएसचे नेते असून, त्यांनी मंत्रिपद भूषवले आहे; मात्र गेल्या वर्षी एका तरुणीचे अपहरण केल्याचा त्यांच्यावर आरोप होता. रेवण्णा यांचा दुसरा मुलगा म्हणजेच प्रज्वलचा भाऊ सूरज यालाही लैंगिक सतावणुकीच्या आरोपावरून गेल्या वर्षी पोलिसांनी अटक केली होती. आपल्याकडे सत्ता आहे म्हणून आपण काहीही केले, तरी ते खपून जाईल, असे नेत्यांना वाटत असते. महिलेचे शोषण केले, तरी ती 'ब्र'देखील काढू शकणार नाही, ही खात्री त्यामागे असते.

'असोसिएशन ऑफ डेमॉक्रॅटिक रिफॉर्म्स' आणि 'नॅशनल इलेक्शन वॉच' या संस्थांनी मिळून केलेल्या अभ्यासातून भयंकर वस्तुस्थिती पुढे आलेली आहे. देशातील १६ खासदार आणि १३५ आमदारांवर बलात्कार, विनयभंग, कौटुंबिक हिसाचार, वेश्या व्यवसायासाठी अल्पवयीन मुलींची खरेदी-विक्री असे गंभीर आरोप आहेत. भाजपच्या सर्वाधिक लोकप्रतिनिधींवर महिला अत्याचाराचे गुन्हे दाखल असल्याचे या अहवालात म्हटले आहे. स्त्रियांवर अत्याचार करण्यात पश्चिम बंगालमधील सर्वाधिक लोकप्रतिनिधींचा समावेश आहे. महाराष्ट्रात १३ लोकप्रतिनिधींवर महिला अत्याचाराचे गुन्हे दाखल आहेत. कायदे बनवणारेच गुन्हेगार असतील, तर न्यायाची अपेक्षा कोणाकडून करायची, असा प्रश्न पडतो. मुळात महिला अत्याचाराचा गुन्हा दाखल असताना प्रज्वलसारख्या नेत्यांना विविध राजकीय पक्ष तिकीट देतातच कसे? डेरा सच्चा सौदाचा प्रमुख आणि बलात्काराचा दोषी गुरमित रामरहीम सिंग याला सतत निवडणुकींच्या वेळी पॅरोल मिळतो. दोन शिष्यांवर अत्याचार केल्याबद्दल तो २० वर्षांची शिक्षा भोगत आहे. अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी स्वयंघोषित संत आसारामबापूलाही जन्मठेपेची शिक्षा झाली आहे. गेल्यावर्षी त्यालाही पॅरोल मिळाला होता.

खरे तर, 'बेटी बटाओ, बेटी पढाओ' या घोषणेमुळे स्त्री-पुरुष विषमता कमी होऊ लागली. स्त्रियांना २६ आठवड्यांची मातृत्वाची रजा देण्याचा निर्णय झाला. लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभांमध्ये एक तृतीयांश जागा महिलांसाठी राखीव ठेवणारे 'नारीशक्ती वंदन विधेयक' दोन वर्षांपूर्वी संसदेत मंजूर झाले. महिलांना सन्मानाची वागणूक मिळावी, असे सरकारचे धोरण आहे; पण प्रत्यक्षात अनेक राजकीय नेतेच महिलांशी दुर्वर्तन करत असतील, तर हे सारे फोल आहे. महिलांकडे वाकड्या नजरेने पाहिल्यास कडक शिक्षा होते, हा संदेश प्रज्वलच्या निमित्ताने राजकारण्यांपर्यंत पोहोचला असेल.

# मतदानाचा हक्क घटनादत्त?

अठरा वर्षांवरील व्यक्तींना मतदानाचा हक्क बजावता येतो. आज जरी मतदानाचा हक्क फक्त कायदेशीर हक्क असला तरी लवकरच त्याच्या दर्जात सुधारणा झाली पाहिजे.

बिहार राज्यातील मतदार याद्यांवरून आज आपल्या देशात गदारोळ माजलेला दिसून येतो. काही लाख मतदारांची नावे यादीत नाही, असा आरोप केला जात आहे तर अनेक नोंदणी झालेले मतदार भारतात बेकायदेशीररित्या घुसलेले घुसखोर आहेत, नागरिक नाहीत असाही आरोप होत आहे. ही सर्व चर्चा व्यवस्थित डोळ्यांखालून घातली तर लक्षात येते की यात 'मतदानाचा हक्क' हा सर्वात महत्त्वाचा आणि कळीचा मुद्दा आहे. देशाच्या नागरिकांना असलेल्या काही खास हक्कांपैकी महत्त्वाचा हक्क म्हणून 'मतदानाचा हक्क' असा उल्लेख अनेकदा केला जातो. पण कायदेशीर पातळीवर, राज्यघटनेच्या संदर्भात मतदानाच्या हक्काचा दर्जा काय आहे?

आधुनिक काळात त्यातही दुसर्या महायुद्धानंतर जगाची मोठ्या प्रमाणात पुनर्रचना झाली. त्यात लोकशाही शासनव्यवस्था सर्वत्र असली पाहिजे यावर एकमत झाले. जर्मनीत आणि इटलीमध्ये जर आधुनिक पद्धतीची लोकशाही असती तर हिटलर, -मुसोलिनीसारखे क्रूरकर्मा सत्तेत आलेच नसते, असे वातावरण निर्माण झालेले होते. म्हणूनच पहिल्या महायुद्धात पराभूत झालेल्या साम्राज्यशाही जर्मनीला दोस्त राष्ट्रांनी लोकशाही शासनव्यवस्था मान्य करण्यास भाग पाडले. दोस्त राष्ट्रांनी जर्मनीला नवी लोकशाहीवादी घटना दिली. ही राज्यघटना म्हणजे वायमर या जर्मनीतल्या गावी बनवलेली राज्यघटना.लोकशाही आली की ठराविक काळानंतर घ्याव्या लागणार्या निवडणूका आल्या आणि निवडणुका आल्या की मतदान आलं, मतदारांच्या याद्या आल्या. हा सर्व प्रवास लक्षात घेतला म्हणजे मतदारांच्या याद्या आणि मतदानाचा हक्क का महत्त्वाचा ठरतो, हे लक्षात येईल. या संदर्भात भारतीय राज्यघटनेचा विचार करायचा आहे.



मतदानाच्या हक्काची चर्चा करण्याअगोदर विविध हक्कांची चर्चा करणे उचित ठरते. यातील पहिले हक्क नैसर्गिक हक्क जे व्यक्तीला जन्मतःच मिळतात. उदाहरणार्थ, जगण्याचा हक्क आणि स्वातंत्र्याचा हक्क वगैरे नैसर्गिक हक्क मानले जातात. त्याचप्रमाणे देशाच्या राज्यघटनेने दिलेले हक्क असतात. त्यांना 'घटनादत्त हक्क' म्हणतात. आपल्या देशाच्या राज्यघटनेत हे हक्क तिस-या भागात नमूद केलेले आहेत. यात सांस्कृतिक हक्क, शिक्षणाचा हक्क वगैरेंचा समावेश आहे. या हक्कांवर जर गदा आली असेल तर भारतीय नागरिकांना उच्च आणि सर्वोच्च न्यायालयात दाद मागता येते. तशी स्पष्ट तरतूद आपल्या राज्यघटनेत केलेली आहे. याव्यतिरिक्त विधानसभा आणि लोकसभा गरज पडेल तेव्हा कायदे करून नवे हक्क निर्माण करू शकतात. उदाहरणार्थ, राष्ट्रीय रोजगार हमी योजनेंतर्गत निर्माण झालेला रोजगाराचा हक्क किंवा वन कायद्याखाली आदिवासींना मिळालेले हक्क. यास 'कायदेशीर हक्क' म्हणतात.

आपल्या राज्यघटनेत कलम ३२६ आहे ज्यानुसार प्रत्येक भारतीय नागरिकाला मतदान करण्याचा हक्क प्रदान केला आहे. येथे फक्त वयाची (अठरा वर्षे) ही एकमेव अट आहे. बाकी शिक्षण, लिंग, धर्म, आर्थिक उत्पन्न वगैरे कोणतीच अट ठेवण्यात आलेली नाही. भारतातील प्रत्येक अठरा वर्षांच्या वरच्या व्यक्तीला 'मतदार' म्हणून स्वतःचे नाव नोंदवून घेण्याचा हक्क आहे. यासाठी आपल्या संसदेने वेळोवेळी कायदे केलेले दिसून येतात. लोकप्रतिनिधी कायदा १९५० तसेच लोकप्रतिनिधी कायदा १९५१ वगैरे याची उदाहरणं आहेत. १९५० च्या कायद्यातील कलम १६ मध्ये कोणते 'बिगर- नागरिक' मतदान करू शकत नाही, याचे तपशील दिलेले आहेत. त्याचप्रमाणे या कायद्यातल्या कलम १९ नुसार ज्या भागात मतदाराचे वास्तव्य आहेत तिथल्या मतदारसंघात त्याचे नाव असले पाहिजे अशीही तरतूद आहे. त्याचप्रमाणे १९५१ च्या कायद्याच्या कलम १९ नुसार ज्या मतदाराचे नाव मतदारयादीत आहे, त्याला मतदान करता येते. याच कायद्याच्या ६२ व्या कलमानुसार मतदारयादीत जर नाव असेल तर मतदान करणं हा मतदाराचा हक्क होतो.

मात्र, अशी मतदार व्यक्ती जर १९५० च्या कायद्यानुसार मतदान करण्यास अपात्र ठरली असेल तर मात्र मतदारयादीत नाव असूनही मतदान करता येणार नाही. त्याचप्रमाणे जर एखादा मतदार तुरुंगात असेल तर त्याला मतदान करता येणार नाही. आता याबद्दल चर्चा सुरू आहे. साधा गुन्हा केलेला मतदार आणिअतिशय गंभीर गुन्हा केलेला गुन्हेगार मतदार यांना एकच नियम लावायचा का? साधा गुन्हा केलेल्या मतदाराला मतदान करण्याचा हक्क दिला तर काय बिघडेल, या दिशेने चर्चा सुरू आहे. खुनाबद्दल शिक्षा झालेला किंवा अशा गंभीर गुन्ह्याबद्दल शिक्षा भोगत असलेल्या गुन्हेगारात आणि साध्या गुन्हेगारात फरक केला पाहिजे, असा एक मतप्रवाह जोर धरत आहे.

'मतदानाचा हक्क' याबद्दल भारतातल्या न्यायालयांनी अनेकवेळा निर्णय दिले आहेत. १९५२ साली सर्वोच्च न्यायालयाने 'एन. पी. पोन्नुस्वामी खटल्यात म्हटले होते की मतदानाचा हक्क हा कायद्याने दिलेला हक्क असून हा हक्क कायद्याच्या तरतुदी सांभाळतच बजावता येईल. याचा दुसरा अर्थ असा की मतदानाचा हक्क नैसर्गिक हक्कांसारखा जन्मतः मिळत नाही. हा कायद्याने दिला जातो आणि कायद्याच्या तरतुदीनुसार वापरायचा असतो. या खटल्याप्रमाणेच आणखी एक महत्त्वाचा खटला म्हणजे १९८२ सालचा ज्योती बासू खटला. यातसुद्धा न्यायालयाने स्पष्ट केलेकी मतदानाचा हक्क हा मूलभूत हक्क नाही. नंतर २००३ सालच्या 'पीयूसीएल' खटल्यातसुद्धा न्यायालयाने याच भूमिकेचा पुनरूच्चार केला मात्र 'मतदानाचा हक्क' हा 'घटनेने दिलेला हक्क' आहे, हेही मान्य केले. २००६ सालच्या कुलदीप नायर खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने भूमिकेत थोडा बदल केला आणि मतदानाचा हक्क फक्त 'कायदेशीर हक्क' आहे असे नमूद केले. या संदर्भातील सर्वात अलीकडचा खटला म्हणजे २०२३ सालचा अनुप बरनबाल खटला. यात सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने मान्य केले की मतदानाचा हक्क फक्त कायदेशीर आहे, राज्यघटनेने दिलेला हक्क नाही. मतदानाच्या हक्काबद्दल आज ही स्थिती आहे.

मात्र, अनुप बरनवाल खटल्यात न्या. अजय रस्तोगी यांनी काही प्रमाणात खंडपीठाशी मतभेद व्यक्त करणारा निर्णय दिला आहे. त्यांच्या मते, मतदाराचा मतदान करण्याचा हक्क म्हणजे त्याचा व्यक्त होण्याचा हक्क. हा हक्क आपल्या घटनेच्या कलम १९ (१) (अ) मध्ये नमूद केलेला आहे. देशात खुल्या वातावरणात निवडणुका घेणं जसं गरजेचं आहे तसंच मतदानाचा हक्क असणंसुद्धा गरजेचं आहे. म्हणजे मग हा मुद्दा घटनेच्या 'मूलभूत आराखडा'चा भाग होतो. मतदानाच्या हक्काला मूलभूत हक्काचा जरी दर्जा दिलेला नाही तरी हा हक्क कलम ३२६ मधून निर्माण होतो, हे मान्य केले पाहिजे. या हक्काला संसदेने वेळोवेळी केलेल्या कायद्यांनी आकार येतो. हे सर्व लक्षात घेता या हक्काचा दर्जा फक्त 'कायदेशीर हक्क' न ठेवता वाढवून 'घटनादत्त हक्क' असा केला पाहिजे, अशी न्या. अजय रस्तोगी यांची मांडणी होती.

# जागतिक व्यापारातील नवा भारत

जगाचे आर्थिक आणि व्यापारी समीकरण सध्या एका निर्णायक संक्रमणाच्या टप्प्यावर आहे. अमेरिका-चीन संघर्ष, युरोपमधील ऊर्जा संकट, ब्रेक्झिट'नंतरचा युरोपियन व्यापाराचा नव्याने उलगडणारा चेहरा आणि कोरोनानंतरच्या पुरवठा साखळीतील खंडित प्रवाह, यामुळे जगभरातील राष्ट्रांना नव्याने अर्थनीती आखावी लागली आहे. अशा पार्श्वभूमीवर भारताने परराष्ट्र व्यापार धोरणामध्ये जे बदल घडवून आणले आहेत, ते रणनीतीपूर्वक आणि काळाची गरज लक्षात घेऊन उभे राहिलेले दिसतात.

जगाच्या अर्थकारणात झपाट्याने बदल होत असताना भारताने अलीकडच्या काळात परराष्ट्र व्यापार धोरणात जे बदल घडवून आणले आहेत, ते निश्चितच दूरदृष्टीचा प्रत्यय देणारे आहेत. युरोपियन युनियन, ऑस्ट्रेलिया, इंग्लंड अशा प्रमुख जागतिक अर्थव्यवस्थांसोबत मुक्त व्यापार करार करण्याच्या दिशेने भारताने सुरू केलेली पावले केवळ कागदी करारांपुरती मर्यादित नसून, ही एक दीर्घकालीन आर्थिक रणनीती म्हणून समजायला हवी. विशेषतः, देशांतर्गत उद्योगांना जागतिक बाजारात नेण्याचा जो प्रयत्न सरकारने या करारांद्वारे सुरू केला आहे, त्यातून 'मेक इन इंडिया' आणि 'आत्मनिर्भर भारत' या योजनांचा खर्या अर्थाने लाभ मिळणार आहे. भारत आणि ब्रिटन (यूके) यांच्यात झालेल्या मुक्त व्यापार करारानंतर आता भारत युरोपियन युनियन व अमेरिकेसह व्यापार करार करण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. यामुळे भारताचे जागतिक व्यापारातील स्थान अधिक बळकट होत असून, देशांतर्गत उद्योगांना विदेशी बाजारपेठेत विस्ताराची संधी मिळत आहे. विशेषतः, ऑस्ट्रेलिया, युरोपियन युनियन, अमेरिका यांच्यासह १२ देशांसोबत व्यापार कराराच्या शक्यता निर्माण झाल्या आहेत.

भारताचा सर्वाधिक द्विपक्षीय व्यापार अमेरिका, चीन, संयुक्त अरब अमिरात, सौदी अरेबिया, हाँगकाँग, नेदरलँड, सिंगापूर, जर्मनी, इंडोनेशिया आणि बेल्जियम यांच्याशी आहे. यातील अनेक देशांसोबत व्यापार करार करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. यामध्ये युरोपियन युनियन, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, इस्रायल, रशिया, नॉर्वे, स्वित्झर्लंड, दक्षिण कोरिया, जपान, अमेरिका, थायलंड आणि संयुक्त अरब अमिरात हे देश आहेत. ऑस्ट्रेलियासोबतचा व्यापार करार नुकताच अंतिम झाला असून, त्यामुळे दोन्ही देशांमधील व्यापार वाढणार आहे. २०२०-२१ मध्ये भारत-ऑस्ट्रेलिया व्यापार ४,४४३.८८ कोटी होता, जो २०२१-२२ मध्ये ८,२८३.१३ कोटींवर गेला. २०२२-२३ मध्ये तो ६,९५१.३२ कोटी, २०२३-२४ मध्ये ७,९४०.७५ कोटी आणि २०२४-२५ मध्ये ८,५७८.८४ कोटींचा अंदाज आहे. हे आकडे दर्शवतात की, या करारामुळे व्यापारात लक्षणीय वाढ झाली आहे.

भारताचे सर्वात मोठे द्विपक्षीय व्यापारी देश म्हणजे अमेरिका (१३१.८४ अब्ज डॉलर), चीन (१२७.७), संयुक्त अरब अमिरात (१००.५), सौदी अरेबिया (४८.३२), हाँगकाँग (४४.३७), नेदरलँड (२५.९५), सिंगापूर (३३.८६), जर्मनी (३२.७), इंडोनेशिया (२५.६८), बेल्जियम (२५.३५) आणि ऑस्ट्रेलिया (२४) हे आहेत. या सर्व देशांसोबत व्यापार करार झाल्यास देशांतर्गत उद्योगांना मोठी चालना मिळणार आहे. या व्यापार करारांमुळे भारतातील लघू व मध्यम उद्योग, उत्पादन क्षेत्र, निर्यातदार यांना जागतिकस्तरावर पोहोच मिळणार आहे. देशांतर्गत वस्तूंना आंतरराष्ट्रीय बाजारात स्पर्धात्मक दर मिळू शकतो. यातून भारतातील रोजगारनिर्मिती वाढण्याची शक्यता आहे. तसेच, परदेशी गुंतवणूक वाढून देशाच्या एकूण आर्थिक विकासात मोठा हातभार लागण्याची शक्यता आहे.

युरोपियन युनियनसोबतचा करार पूर्णत्वास नेण्यासाठी भारत आणि युरोपीय देशांमध्ये वाटाघाटी सुरू आहेत. हा करार अंतिम झाल्यास भारताला युरोपीय बाजारपेठेत सुलभ प्रवेश मिळेल. तसेच, अमेरिकेसोबतही व्यापार कराराच्या शक्यता असून, ऑगस्ट महिन्याच्या अखेरीस एक अमेरिकन शिष्टमंडळ भारत भेटीवर येणार असल्याचे सांगितले जात आहे. या सर्वांच्या माध्यमातून भारताचे परराष्ट्र धोरण सध्या व्यापारकेंद्रित बनत आहे. विविध देशांबरोबर व्यापार करार करणे हे केवळ आर्थिक फायदे देणारे नाही, तर ते भारताच्या जागतिक प्रभावासाठीही उपयुक्त आहे.

२०१९-२० च्या तुलनेत २०२३-२४ या आर्थिक वर्षात भारताच्या एकूण निर्यातीत २२.८ टक्क्यांची वाढ झाली आहे. यामध्ये सेवा निर्यातीचा वाटा ३३.४ टक्क्यांवर पोहोचला असून, सॉफ्टवेअर, आरोग्य, शिक्षण, वित्तीय सल्लागार सेवा आणि तंत्रज्ञानआधारित उपाययोजना यांचा मोठा वाटा आहे. फेब्रुवारी २०२५ अखेरपर्यंत भारताचे एकूण परकीय व्यापाराचे मूल्य १.७८ ट्रिलियन डॉलरवर पोहोचले आहे, ज्यामध्ये निर्यात ७४८ अब्ज डॉलर आणि आयात १.०३ ट्रिलियन डॉलर एवढी आहे. विशेषतः, भारताचा अमेरिका आणि युरोपियन युनियनसोबतचा व्यापार गेल्या दोन वर्षांत सरासरी १८ टक्क्यांनी वाढलेला आहे. या व्यापार करारांमुळे भारतीय उत्पादनांना नवीन ग्राहक, नवीन बाजारपेठा आणि नवीन संधी मिळत आहेत. विशेषतः, लघू, मध्यम व सूक्ष्म उद्योगांना (एमएसएमई) यामुळे मोठा फायदा होईल.



यामुळे भारताचे आर्थिक सामर्थ्य वाढत आहे आणि तो एक विश्वासार्ह व्यापार भागीदार म्हणून उदयास येत आहे. आतापर्यंत झालेल्या करारांमुळे भारतातील उत्पादन क्षेत्र, सेवा उद्योग, तंत्रज्ञानआधारित स्टार्टअप्स यांना नव्या बाजारपेठा खुल्या झाल्या आहेत. भारताचा आर्थिक विकास केवळ देशांतर्गत विक्रीवर निर्भर नसून, तर आता तो निर्यातीच्या माध्यमातून वैश्विक बनतो आहे. भारत आता केवळ एक विकसनशील देश राहिलेला नाही, तर तो एक व्यापार क्षेत्रातील प्रमुख देश म्हणून उभा राहतो आहे. उपरोक्त सगळ्या देशांमध्ये उच्च तंत्रज्ञान, औद्योगिक उपकरणे, ऊर्जा, आंतरराष्ट्रीय सेवा या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक आणि व्यापार होतो. अशा क्षेत्रांमध्ये भारताने स्थान मिळवणे म्हणजे जागतिक स्पर्धेत नवी उंची गाठणे होय.

आतापर्यंत जे उद्योग फक्त देशांतर्गत मागणीवर अवलंबून होते, त्यांना आता जागतिक मागणीस प्रतिसाद देण्याची क्षमता प्राप्त होईल. परिणामी, रोजगारनिर्मिती वाढून उत्पादन क्षमता वाढेल आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, देशाच्या निर्यातीत मोठी वाढ होईल. जर सरकारने या करारांना पाठबळ देण्यासाठी योग्य पायाभूत सुविधा, सुलभ निर्यात प्रक्रियेची धोरणे आणि वित्तपुरवठा, यासाठी भक्कम पायरी उभी केली तर ही वाढ दीर्घकालीन टिकणारी असेल, असे असले तरी युरोपियन युनियनसारख्या गटांशी करार करताना केवळ व्यापार आकडे नव्हे, तर मानवाधिकार, पर्यावरण सुरक्षा, बौद्धिक संपदा हक्क अशा मुद्द्यांचाही सखोल विचार करावा लागतो. भारताने या क्षेत्रात नेमकी आणि मोजकी रणनीती आखून या आंतरराष्ट्रीय कसोट्याही पार करायला हव्यात.

# महाराष्ट्र राज्य सरकारी कर्मचारी महासंघाची राज्य कार्यकारिणी जाहीर

नवी मुंबई / के. एच. हनवते :– (ठाणे) शासन मान्यता प्राप्त संघटनांचा समूह असलेल्या महाराष्ट्र राज्य सरकारी कर्मचारी महासंघाची २०२५ –२०२७ ची राज्य कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे. यानुसार या संघाच्या राज्य अध्यक्षपदी : श्री नितीन देशमुख, तर उपाध्यक्षपदी विनोद परमार, प्रमोद मोरे, संदीप तारगे, उमाकांत मुळे, कार्याध्यक्षपदी अविनाश भुजबळराव, सागर घाडगे, तर महासचिवपदी श्री सुदर्शन शिंदे यांची निवड सर्वानुमते जाहीर करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य सरकारी कर्मचारी महासंघाची वार्षिक सर्वसाधारण सभा ठाणे पूर्व येथील मंगला हॉल मध्ये अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात अलिकडेच संपन्न झाली. त्यावेळी ही कार्यकारणी महासंघाची दोन वर्षांसाठीचे पदाधिकारी जाहीर करण्यात आले.यानुसार महासंघाचे इतर पदाधिकारी पुढील प्रमाणे सहसचिव– संजय पतंगे,दत्तात्रय सोनवणे, अतुल बनसोड, नवनाथ आव्हाड, मकरंद बापर्डेकर, सुधीर कात्रे,उपसचिवपदी चंद्रकांत निमाळे, शंकर वानखेडे, विलास गुरव, खजिनदार–श्रीमती संचिता परब, उपखजिनदार नीता वरंगटे, हिशोब तपासणीस–संदीप सावंत, प्रमुख संघटक–प्रमोद महाडिक उल्हास चोरमले, सतीश जोगी कु.लता जाधव, संघटक– दीपक कातकर, संतोष पोयेकर, सुरेश बापर्डेकर यांची निवड केली आहे. महाराष्ट्र राज्य सरकारी कर्मचारी महासंघाचे नावात बदल तथा विस्तारित करणे राज्यातील विविध शासकीय कार्यालयात, रुग्णालयात, सार्वजनिक उपक्रम, शासकीय महामंडळे, शिक्षण संस्थांमध्ये कार्यरत असणारे कर्मचारी पदाधिकारी/




सदस्य बहुतांश अधिकारी पदावर पदोन्नती झाल्यामुळे महासंघाच्या नावात बदल करणे किंवा विस्तारित करणे अत्यंत गरजेचे आहे. यासाठी यापुढे महासंघाचे नाव महाराष्ट्र राज्य सरकारी कर्मचारी अधिकारी महासंघ म्हणून करण्यात येत आहे.याबाबतचा ठराव संघाच्या या सर्वसाधारण सभेत मंजूर करण्यात आला आहे. सेवानिवृत्तीचे देय भत्ते,लाभ त्वरीत देण्याची मागणी✻ शासकीय कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती नंतरचे देय भत्ते,लाभ त्वरीत देण्यात यावे किमान देय भत्ते,लाभाचे एक दोन धनादेश तरी देण्यात यावे अशी जोरदार मागणी करणारा ठराव संघाच्या या सर्वसाधारण बैठकीत मंजूर करण्यात आला.,अशी माहिती संघाचे अध्यक्ष नितीन देशमुख यांनी दिली. कंत्राटी, बाह्यस्त्रोत बायोमेडिकल मेडिकल इंजीनियर्संना सेवेत कायम करा शासकीय रुग्णालयात कार्यरत असलेले बाह्यस्त्रोत बायोमेडिकल इंजीनियर याच बरोबर यवतमाळ विदर्भात शासकीय रुग्णालयातील बाह्यस्त्रोत बायोमेडिकल,कंत्राटी इंजीनियर्सना शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभाग तथा वैद्यकीय शिक्षण विभागात शासन सेवेत,नोकरीत कायमस्वरुपी सामावून घेण्यात यावे अशी मागणीही संघाच्या या सर्वसाधारण बैठकीत करण्यात आली. जुनी पेन्शन सुरु करा शासकीय कर्मचाऱ्यांसाठी निवृत्तीनंतर लागू होणारी जुनी पेन्शन योजना राज्य शासनाने सुरु करावी अशी मागणीही संघाच्या सर्वसाधारण सभेत करण्यात आली.यानुसार याबाबतचा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला. याच बरोबर जुन्या पेन्शन बाबत शासनाकडे पाठपुरावा करण्याचे आणि जुन्या पेन्शन विषयी संघाची भूमिका शासनाकडे स्पष्ट करण्याचे या सर्वसाधारण सभेत सर्वानुमते ठरविण्यात एका ठरावाद्वारे ठरविण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्य सरकारी कर्मचारी अधिकारी महासंघाच्या या वार्षिक सर्वसाधारण सभेला संघाचे प्रमुख सल्लागार सेवानिवृत्त नायब तहसीलदार गिरीश अलोणे, उच्च शिक्षण संचालनालाय पुणे येथील अधिक्षक, महासंघाचे उपसचिव दत्तात्रय सोनवणे, प्रादेशिक दुग्ध विकास कार्यालय छ. संभाजीनगरचे श्याम बेनके,नाशिक जिल्हा दुग्ध विकास कार्यालयातील गोकुळ जाधव,अनंत जाधव,सुधीर कात्रे, शंकर वानखेडे,पांडुरंग कळपे, विलास गुरव,दीपक कातकर, प्रमोद महाडिक, संतोष पोयेकर, सर्वश्री सीता गवरा, दडस, तृशाली जाधव, संचिता परब आदी मान्यवरांसह शासनाचे कर्मचारी मोठ्या बहूसंख्येने या सर्वसाधारण सभेस उपस्थित होते.

# ठक्करवाड कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला एकाच दिवशी दोघांचे दुःखद निधन कासराळी गावावर शोककळा



बिलोली/ प्रतिनिधी :– कासराळी ता. बिलोली येथील माजी आमदार स्वर्गीय गंगारामजी ठक्करवाड यांच्या घरी एकत्रित कुटुंब पद्धती अजूनही सुरु आहे. ते आणि त्यांच्या बहिणीचे कुटुंब अनेक वर्षांपासून कासराळी येथे एकत्रित राहत असत.आपल्या बहिणीचे निधन झाल्यानंतर त्यांच्या कुटुंबाचे संगोपन माजी आमदार गंगारामजी ठक्करवाड यांनीच केले.

माजी आमदार गंगारामजी ठक्करवाड हे राजकारणात व्यस्त असतांना त्यांच्या शेतीवाडी व इतर व्यवहार त्यांचे भाऊजी गंगाराम रामन्ना ठक्करवाड हे सांभाळून घेत होते. या दोघांचेही पुत्र पुढे आपापल्या क्षेत्रात स्थिरावले असले तरी आदर्श एकत्रित कुटुंब पद्धत अजूनही कायम आहे. यातच गतवर्षी माजी आमदार ठक्करवाड यांचे निधन झाले. त्यानंतर काही दिवसातच त्यांचे भाऊजी गंगाराम रामन्ना ठक्करवाड हे विरहाने आजारी पडले.

यातच आज दि. ४ ऑगस्ट रोजी सकाळी गंगाराम रामन्ना ठक्करवाड (अय्या ) वय ८० वर्ष यांचे दुःखद निधन झाले. त्यांचे पार्थिव देह नांदेड येथून कासराळी येथे आणताच आपल्या मानसभाऊ व नंदवाईच्या मृतदेहाला पाहून माजी आमदार गंगाराम ठक्करवाड यांच्या पत्नी श्रीमती पोसानबाई गंगाराम ठक्करवाड वय ७८ वर्ष यांना हृदयविकाराचा तिव्र धक्का येऊन यात त्यांचेही दुःखद निधन झाले.त्यामुळे या दोघांच्या निधनाने ठक्करवाड परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला असून कासराळी नागरिवर शोककळा पसरली



असून सर्वत्र हळ हळ व्यक्त करण्यात येत आहे.

जि. प. सदस्य लक्ष्मणराव ठक्करवाड यांच्या श्रीमती पोसानबाई ठक्करवाड या आई तर गंगाराम रामन्ना ठक्करवाड हे मामा होत.या दोघांच्याही पश्च्यात शंकर ठक्कर वाड गुरुजी, संजय ठक्करवाड सर, कासराळीचे माजी सरपंच डुळींलह ठक्करवाड, डॉ. रोहित ठक्करवाड यांच्यासह सुना, नातवंड व मोठा परिवार आहे.दोघांच्याही पार्थिव देहावर अमृतधाम गोशाळा कासराळी येथे सायंकाळी अंतिम संस्कार करण्यात येणार आहे.

# डेंग्यू प्रतिबंधाकरिता लातूर महानगरपालिकेकडून अबेटिंग मोहिमेची तिसरी फेरी

लातूर/प्रतिनिधी :– डेंग्यू प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा महत्त्वाचा भाग म्हणून आयुक्त श्रीमती मानसी, लातूर शहर महानगरपालिका यांच्या आदेशानुसार आणि उपायुक्त डॉक्टर पंजाबराव खानसोळे उपायुक्त (आरोग्य) लातूर शहर महानगरपालिका यांच्या मार्गदर्शनानुसार लातूर शहरामध्ये अबेटिंग मोहीमेची तिसरी फेरी दिनांक ४ ऑगस्ट २०२५ पासून राबवण्यात येत आहे. त्या अनुषंगाने लातूर महानगरपालिका अंतर्गत कार्यरत सर्व आशा स्वयंसेविका आणि आरोग्य कर्मचारी यांची कार्यशाळा शनिवारी दिनांक ०२ ऑगस्ट रोजी भालचंद्र ब्लड बँक येथे डॉ शंकर भारती वैद्यकीय आरोग्य अधिकारी लातूर मनपा आणि डॉ ऋषिकेश खरोळकर यांच्या उपस्थितीत पार पडली. या मोहिमेमध्ये लातूर शहर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातील २०३ आशा स्वयंसेविका ४६ आरोग्य सेविका आणि १६ आरोग्य कर्मचारी पुरुष यांचा सहभाग असणार आहे या मोहिमेमध्ये घरोघरी जाऊन डास उत्पत्तीच्या ठिकाणांचे सर्वेक्षण करण्यात येणार असून आढळलेली डास उत्पत्तीचे ठिकाणी शक्यतो नष्ट करणे किंवा तसे शक्य नसल्यास त्या पाण्यामध्ये औषध टाकने, प्रसंगी वारंवार डास उत्पत्तीचे ठिकाणे आढळून येणाऱ्या ठिकाणी संबंधितांना सूचना पत्र देणे ही कामे केली जाणार आहेत. यासोबतच शहरामध्ये डासांवर नियंत्रण आणण्यासाठी प्रसंगी धूरफवारणी देखील केली जाणार आहे. सन २०२४ या वर्षात आरोग्य विभाग लातूर मनपा मार्फत संशयित डेंग्यू रुग्ण यांचे एकूण १६९३ रक्तजल नमुने संकलित करून त्यांची सेन्टेनल लॅब येथे डेंग्यू तपासणी करण्यात आली होती, त्यापैकी लातूर शहरातील ९३५ रुग्णांपैकी ३१९ रुग्णांचे रक्तजल नमुने डेंग्यू करिता पॉझिटिव्ह आले होते. परंतु यावर्षी डेंग्यू रोगाचा प्रादुर्भाव शहरामध्ये आणखी कमी करण्याच्या दृष्टीने विविध उपाययोजना राबवण्यात येणार आहेत. माहेजानेवारी ते जुलै २०२५ अखेर लातूर शहरामध्ये ३१ डेंग्यू पॉझिटिव्ह रुग्ण आढळून आले आहेत. त्यामुळे सर्वात महत्त्वाचे नागरिकांनी देखील जागरूक राहून आपल्या स्तरावरील प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा सुयोग्य वापर केला पाहिजे, असे मत लातूर






महानगरपालिकेचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. शंकर भारती यांनी व्यक्त केले.

एबॅटिंग मोहिमेचे महत्त्व :

या मोहिमेमध्ये डास उत्पत्तीची ठिकाणे ही मुख्यत्वे नष्ट केली जातात. ज्या ठिकाणी या डास उत्पत्तींच्या ठिकाणांना नष्ट करणे शक्य नसते, त्या ठिकाणी पाण्यामध्ये औषधी (अबेट ) टाकली जाते, जेणेकरून त्यातील डास अळ्या मृत पावतात व पुढे डासांची उत्पत्ती होत नाही. परिणामी डास उत्पत्ती न झाल्यामुळे डासांपासून पसरणारे आजार जसे की डेंग्यू, चिकुनगुनिया यांना प्रतिबंध घालणं सोपे होते.

डेंग्यू विषयी महत्त्वाचे

डेंग्यू झालेल्या बहुतेक लोकांना सर्वात सामान्य लक्षणे म्हणजे उच्च ताप, डोकेदुखी, अंगदुखी, मळमळ आणि पुरळ . बहुतेक लोक १–२ आठवड्यात बरे होतात. काही लोकांना गंभीर आजार होतो आणि त्यांना रुग्णालयात उपचारांची आवश्यकता असते. गंभीर प्रकरणांमध्ये, डेंग्यू प्राणघातक ठरू शकतो. विशेषतः दिवसा डास चावणे टाळून तुम्ही डेंग्यूचा धोका कमी करू शकता. डेंग्यूवर सध्या कोणताही विशिष्ट उपचार नसल्याने लक्ष्मणा नुसार उपचार केले जातात.

लक्षणे –

डेंग्यू झालेल्या बहुतेक लोकांना सौम्य किंवा कोणतीही लक्षणे नसतात आणि ते १–२ आठवड्यांत बरे होतात. प्रामुख्याने ताप, डोकेदुखी, डोळ्याच्या मागील बाजूस तीव्र वेदना, थकवा, अंगदुखी, लालसर रंगाची लघवी होणे, इत्यादी लक्षणे असू शकतात. दुसऱ्यांदा संसर्ग झालेल्या व्यक्तींना गंभीर डेंग्यूचा धोका जास्त असतो. ताप कमी झाल्यानंतर डेंग्यूची गंभीर लक्षणे अनेकदा दिसून येतात: –

तीव्र पोटदुखी
सतत उलट्या होणे
जलद श्वास घेणे
हिरड्या किंवा नाकातून रक्त येणे
थकवाअस्वस्थता उलट्या किंवा मल मध्ये रक्त येणे
खूप तहान लागणे
फिकट आणि थंड त्वचा
अशक्तपणा जाणवणे.

ही गंभीर लक्षणे असलेल्या लोकांनी ताबडतोब काळजी घ्यावी. बरे झाल्यानंतर, डेंग्यू झालेल्या लोकांना अनेक आठवडे थकवा जाणवू शकतो.

निदान आणि उपचार –

डेंग्यूवर कोणताही विशिष्ट उपचार नाही. लक्षणानुसार उपचार करण्यावर लक्ष केंद्रित केले जाते. डेंग्यू तापाच्या बहुतेक प्रकरणांमध्ये घरी उपचार करता येतात. वेदना नियंत्रित करण्यासाठी ॲसिटामिनोफेन (पॅरासिटामॉल) चा वापर केला जातो. इबुप्रोफेन आणि ॲस्पिरिन सारखी नॉन–स्टेरॉइडल अँटी–इंफ्लेमेटरी औषधे टाळली जातात कारण ती रक्तस्त्राव होण्याचा धोका वाढवू शकतात. गंभीर डेंग्यू असलेल्या लोकांना अनेकदा रुग्णालयात दाखल करावे लागते.

संसर्ग – डासांच्या चाव्याव्दारे संक्रमण डेंग्यू विषाणू संक्रमित मादी डासांच्या चाव्याव्दारे मानवांमध्ये पसरतो, प्रामुख्याने एडीस एजिप्ती डास. एडीस वंशातील इतर प्रजाती देखील वाहक म्हणून काम करू शकतात, परंतु त्यांचे योगदान सामान्यतः एडीस एजिप्तीपेक्षा दुय्यम असते.

प्रतिबंध आणि नियंत्रण –

डेंग्यू पसरवणारे डास दिवसा सक्रिय असतात. खालील गोष्टी वापरून डासांच्या चावण्यापासून स्वतःचे संरक्षण करून डेंग्यू होण्याचा धोका कमी करा: –

शक्य तितके शरीर झाकणारे कपडे;
दिवसा झोपण्यासाठी मच्छरदाण्या वापराव्यात, तर कीटकनाशक फवारलेल्या जाळ्या वापराव्यात;
खिडकीचे पडदे;
डास प्रतिबंधक (ऊएएढ, झळलरीळवळप किंवा खठ३५३५ असलेले); आणि
कॉइल आणि व्हेपोरायझर.

डासांची पैदास रोखता येते: पर्यावरणीय व्यवस्थापन आणि सुधारणांद्वारे डासांना अंडी घालणाऱ्या अधिवासात प्रवेश करण्यापासून रोखणे; घनकचऱ्याची योग्य प्रकारे विल्हेवाट लावणे आणि पाणी साठवू शकणारे कृत्रिम मानवनिर्मित अधिवास काढून टाकणे; आठवड्यातून एकदा घरगुती पाणी साठवणूक भांडी झाकणे, रिकामे करणे आणि स्वच्छ करणे; बाहेरील पाणी साठवण्याच्या भांड्यांमध्ये योग्य कीटकनाशके वापरणे.

जर तुम्हाला डेंग्यू झाला तर हे महत्वाचे आहे: –

विश्रांती;
भरपूर द्रवपदार्थ प्या;
वेदनांसाठी ॲसिटामिनोफेन (पॅरासिटामॉल) वापरा;
इबुप्रोफेन आणि ॲमस्पिरिन सारख्या नॉन–स्टेरॉइडल अँटी–इंफ्लेमेटरी औषधे टाळा; आणि
गंभीर लक्षणे दिसल्यास लवकरात लवकर डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

तरी नागरिकांनी देखील डेंगी आजाराच्या प्रतिबंधाकरिता वैयक्तिक पातळीवरून सक्रिय सहभाग नोंदवून आपला खारीचा वाटा उचलावा आणि या राबवण्यात येणाऱ्या अबेटिंग मोहिमे करिता आपल्या घरी किंवा परिसरात येणाऱ्या आरोग्य कर्मचाऱ्यांना सहकार्य करण्याचे आवाहन लातूर महानगरपालिकेमार्फत करण्यात आले आहे.

## शेतकऱ्यांच्या भाकड जनावरांचा सर्वे करून तात्काळ शेतकऱ्यांना मदत द्यावी–चंद्रकांत खरात सर

केज/प्रतिनिधी शेतकऱ्यांच्या भाकड जनावरांचा सर्वे करून तात्काळ शेतकऱ्यांना मदत देण्यात यावी अशी लेखी निवेदनाद्वारे केज तहसील चे तहसीलदार राकेश गिड्डे यांच्याकडे भीमशक्ती सामाजिक संघटनेचे मराठवाडा संघटक चंद्रकांत खरात सर यांनी मागणी केली आहे. जर सदर मागणीची प्रशासनाने दखल न घेतल्यास भीमशक्ती सामाजिक संघटनेच्या वतीने संबंध मराठवाड्यात जन आंदोलन छेडण्यात येईल असा प्रशासनाला इशारा दिला आहे. आमच्या प्रतिनिधीशी बोलताना चंद्रकांत खरात सर म्हणाले की, सतत कुरेशी समाज बांधवासह जनावरांचा व्यापार करणाऱ्या व्यावसायिकांवर अन्याय होत असल्यामुळे कुरेशी समाज बांधव व व्यापाऱ्यांनी बंद पुकारल्यामुळे सध्या व्यापारी व शेतकरी यांच्यावर उपासमारीची



मराठवाड्यामध्ये जन आंदोलन छेडण्यात येईल असा प्रशासनाला इशारा देण्यात आला आहे. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, सध्या कुरेशी समाज बांधवांनी व व्यापाऱ्यांनी संबंध राज्यभर जनावरांची खरेदी विक्री सह इतर व्यवसाय बंद करून संप पुकारला आहे. कुरेशी समाज बांधवांच्या व व्यापाऱ्यांच्या संपामुळे सध्या शेतकरी अडचणीत सापडलेले आहेत. त्याकरिता शासनाने तात्काळ शेतकऱ्यांच्या निरंथक, मोडलेल्या जनावरांसह इतर भाकड जनावरांचा सर्वे करून शेतकऱ्यांना योग्य तो मोबदला देण्यात यावा अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे चंद्रकांत खरात सर यांनी केली आहे. जर प्रशासनाने सदर मागणीची तात्काळ दखल न घेतल्यास भीमशक्ती सामाजिक संघटनेच्या वतीने वेळ आली आहे त्याकरिता शासनाने तात्काळ सदर मागणीची दखल घ्यावी. लेखी निवेदनाच्या प्रती तहसीलदार केज, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार, जिल्हाधिकारी बीड यांना दिल्या आहेत. सदर मागणीचे निवेदन हे केज तहसील चे तहसीलदार राकेश गिड्डे यांनी स्वीकारले आहे.

# नालंदा विद्यालयात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी साजरी

केज/प्रतिनिधी केज शहरातील महात्मा ज्योतिबा फुले शिक्षण प्रसार प्रसारक मंडळ केज, संचलित, केज शहरातील नालंदा विद्यालय येथे साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक श्री.मस्के.एन.बी.सर व प्रमुख पाहुणे म्हणून संजय सोनवणे व प्रवीण सोनवणे हे उपस्थित होते. सर्वप्रथम लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे प्रस्ताविक श्री.लोंढे.एन.आर. यांनी केले. प्रस्ताविकानंतर शाळेतील विद्यार्थी प्रतिनिधी चि.अलाट विवेक,कु.शेख जरिया,चि.मस्के अंकुर,चि.शेख नुमान,चि.लोंढे रितेश,चि.मजमुले सुमित,कु. प्राजक्ता, कु. शेख रेश्मा यांनी लोकशाहीर आण्णाभाऊ साठे व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्याविषयी मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमाप्रसंगी शाळेतील ज्येष्ठ शिक्षक श्री. कांबळे.एन.व्ही. सर यांनी दीड दिवस शाळेत जाणारेअण्णाभाऊ साठे यांनी फार मोठ्या साहित्याची निर्मिती केली आहे. आणि तत्कालीन समाजातील विषमता व वास्तव याचीआपल्या साहित्यामधून मांडणी केली. तसेच ''स्मशानातील सोने, ही कथा विद्यार्थ्यांना सांगितली.

अध्यक्षीय समारोपात श्री. मस्के.एन.बी.सर यांनी लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांचा जीवनपट उलगडून सांगितला. अण्णाभाऊ साठे शाहीर कथाकार कादंबरीकार नाटककार व प्रवास वर्णन कार होते. त्यांनी ३५–कादंबऱ्या, १३–कथासंग्रह, १३–लोकनाट्य १–शाहिरी पुस्तक, १५–पोवाडे, ७–चित्रपट कथा, १–प्रवास वर्णन इत्यादी फार मोठ्या प्रमाणात साहित्याची निर्मिती केली. भारतीय भाषेत मराठी,



हिंदी, गुजराती ,हिंदी ओडिया, बंगाली, तामिळ, मल्याळी ,या भाषेत साहित्याची निर्मिती केली. तसेच परकीय भाषेतही रशिया ,झेक,पोलिश,इंग्रजी, फ्रेंच, अशा जगातील २७ भाषेमध्ये त्यांच्या साहित्याचा अनुवाद करण्यात आलेला आहे. त्यांची प्रसिद्ध साहित्यकृती फकीराही कादंबरी तिला इसवी सन १९६१ मध्ये शासनाचा सर्वश्रेष्ठ पुरस्कार मिळाला. व त्यांनी ही कादंबरी व आपले साहित्य डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या चरणी अर्पण केले.

गुलामगिरीच्या या चिखलात
रुतून बसला का ऐरावत
अंग झाडून निघ बाहेरी
घेऊन बिन्नी वर घाव
जग बदल घालुनी घाव
सांगून गेले मज भीमराव...

संयुक्त महाराष्ट्राची चळवळ ही लोकमानसात रुजवण्याचे काम लोकशाहीर आण्णाभाऊ साठे, शाहीर अमर शेख, शाहीर गव्हाणकर यांनी केले. लाल बावटा कला पथकाची निर्मिती करून मुंबई, मराठवाडा, विदर्भ ,कोकण, पश्चिम महाराष्ट्र व सीमा वरती भागत संयुक्त महाराष्ट्राची चळवळ पोहोचवली. स्वातंत्र्यानंतर भारतातील अन्यायकारक सरकार हे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना मान्य नव्हते म्हणून त्यांनी १६ ऑगस्ट १९४७ या रोजी मुंबई येथे २०००० लोकांचा मोर्चा काढून या मोर्चाचे नेतृत्व करतानाये आजादी झुठी है, देश की जनता भुकी है... अशी घोषणाबाजी केली.

पहिले दलित साहित्य संमेलन मुंबईमध्ये १९५८ मध्ये भरले. त्याचे अध्यक्ष लोकशाहीर अण्णाभाऊ साठे हे होते. आपल्या अध्यक्षीय भाषणातून जनतेला व समाजाला पृथ्वी ही शेषनागाच्या मस्तकावर तारलेली नसून, कामगार, कष्टकरी, व श्रमिकांच्या तळ हातावर तारलेलीआहे. असा उपदेश केला.

इसवी सन २०१९ साली लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त केंद्र सरकारने टपाल तिकीट सुरू केले.

स्वतंत्र चळवळीचेअग्रदूत लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी केसरी व मराठा यासारखी वृत्तपत्रे सुरु केली. स्वातंत्र्य चळवळीला प्रेरणा देणारे विचार या वृत्तपत्रांमधून लोकांसमोर मांडले व स्वातंत्र्य चळवळ गतिमान केली. त्यांनी शिवजयंती गणेशोत्सव हे सुरू केले. शिवजयंती व गणेशोत्सव या कार्यक्रमांतर्गत लोककलेच्या मेळ्यामधून स्वातंत्र्याला प्रेरणा देणारे विचार लोकापर्यंत पोहोचवता येतील.

शाळेतील विद्यार्थ्यांनी महापुरुषांचा आदर्श घेऊन देशासाठी समाजासाठी चांगले काम करावे. आदर्श नागरिक होण्यासाठी महापुरुषांचे विचार अत्यंत मोलाचे काम करतात. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री.गरड.पि.डी,श्री. कदम.एस.एस., श्री. बडे.ए.टी., श्री वाघमारे.एस.बी. व श्रीमती गुरमे.टी.एम. कार्यक्रमाप्रसंगी सर्व विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी वाघमारे सर यांनी सर्वांच्या आभार मानले. यावेळी शाळेचे शिक्षक वृंद आणि सर्व विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

# बालपण, तारुण्य यापलीकडे जाऊन प्रौढत्व जगणारी माता म्हणजे त्यागमूर्ती रमाई - बौद्धाचार्या साक्षी प्रमोद मोरे



मुंबई :- बुद्धांने आपल्याला जन्मपासून मृत्यूपर्यंत एक सिद्धांत दिला आहे त्यानुसार तुमचं बालपण, तारुण्य, प्रौढत्व ते महापरिनिर्वाण पर्यंत आपण जगत असलेली जीवनात तुम्हाला उंच शिखर गाठायचं असेल व आदर्श जीवनपद्धत अवलंबायची असेल तर आपलं मन समाधानी, शांत व स्थिर असलं पाहिजे तरच आपण उंच शिखर गाठू शकतो, बुद्धांच्या याच सिद्धांताला अनुसरूनच माता रमाईनी आपला जीवनप्रवास केलेला आहे, संपूर्ण आयुष्य खडतर जीवन जगण्यात घालवलेल्या रमाईचे आई-वडील भिकू धोत्रे व आई रुक्मिणी धोत्रे यांनी वलंगकर नाव धारण केल होते, आई रुक्मिणी हिने लहानग्या रमाईवर चांगले संस्कार केले दुपारच्या वेळी माय लेक गप्पा मारत बसत त्यावेळी आई रुक्मिणी म्हणत असे रमा लवकरच तुझं लग्न तू दुसऱ्याच्या घरी जाणार आहेस म्हणून त्या सुखी संसार कसा करावा, कुटुंबात कसे राहाव, कस वागावं याचे धडे सातत्याने रमाला देत असत, रमाईचे वडील भिकू धोत्रे (वलंगकर) हे मच्छीच्या पाट्या वाहून नेने आदी जड कष्टकरी कामे करीत त्यामुळे त्यांना छातीचा आजार बळावला होता त्यातच रक्ताच्या उलट्या ही झाल्या होत्या त्यांच्या तब्येतीच्या काळजीने रुक्मिणी आतून झुरत होत्या त्यामुळे त्यांचीही तब्येत खालावत चालली होती सोबतच रमाच्या वडिलांची तब्येत ही नाजूक असल्याने आपल्या मुलांच्या डोक्यावरच पितृछत्र हरपेल की काय ह्या विचाराने ही आई रुक्मिणी खंगल्या होत्या, शेवटी नियतीने घाला घातलाच एक आईच्या अचानक जाण्याचे दुःख रमासाठी मोठा आघात होता तरी आपली लहान भावंडांना बघून तिने स्वतः ला सावरले आईच्या मागे आपली तीन भावंडे व वडिलांचा तिने आईच्या मायेने सांभाळ केला, रुक्मिणीच्या अचानक जाण्याने भिकू धोत्रे ही खालावले होते अंतिम क्षणी त्यांनी रमा व तिच्या भावंडांना जवळ बोलवलं व सांगितले की 'रमा तुझ्या आई नंतर तू मला व तुझ्या भावंडाना आईच्या मायेनं सांभाळलं आता माझा ही शेवट आला आहे तरी या तुझ्या तिन्ही भावंडांना सांभाळ' वडीलांच्या नंतर रमाने लहान भावंडांना सांभाळलं, लग्नानंतर बाबासाहेबांना त्यांनी आपल तन मन धन अर्पण केल, त्याना साथ दिली, त्यांच्या संसाराचा गाडा समर्थपणे ओढला, वेळप्रसंगी उपाशी राहून, गौऱ्या विकून बाबासाहेबांच्या मागे हिमलयासारखी उभी राहिली, बाबासाहेबांची सामाजिक, राजकीय कारकीर्द बहरावी याकरता त्यांनी आपल्या वैवाहिक सुखाचा ही त्याग केला, आपल्या चार मुलांना मातीआड करूनही तिने नऊ कोटी लेकरांच भविष्य लिहिण्यासाठी बाबासाहेबांना साथ दिली, आपल्या प्रत्येक सुखाचा त्याग करून केवळ कुटुंब हेच आपलं सुख म्हणूनच बालपण, तारुण्य, प्रौढत्व जगणारी माता म्हणजे त्यागमूर्ती रमाई होय असे प्रतिपादन बौद्धजन पंचायत समिती आयोजित वर्षावास प्रवचन मालिकेचे पाचवे पुष्प गुंफत असताना साक्षी प्रमोद मोरे यांनी केले. बौद्धजन पंचायत समिती संलग्न संस्कार समिती यांच्या संयुक्त विद्यमाने वर्षावास प्रवचन मालिकेचे आयोजन करण्यात आले आहे त्या प्रवचन मालिकेचे पाचवे पुष्प उपसभापती विनोद मोरे यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक सभागृह, परेल, मुंबई - १२ येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनोहर बा. मोरे यांनी आपल्या धीरगंभीर पहाडी आवाजात केले तर संस्कार समितीचे अध्यक्ष मंगेश पवार यांनी पाहुण्यांची ओळख करून देत प्रस्ताविक सादर केले प्रास्ताविक सादर करताना त्यांनी स्मारकाच्या निधी करता बौद्धाचार्य, बौद्धाचार्यांना, बौद्ध धम्म अनुयायी यांनी सढळ हस्ते मदत करीत ऑक्टोबर पर्यंत जमा करावे असे आवाहन केले.

अध्यक्षीय भाषणात उपसभापती विनोद मोरे यांनी व्याख्यात्या साक्षी मोरे यांनी त्यागमूर्ती माता रमाई यांची जीवनगाथा सादर करताना उदाहरणांसह जी मांडणी केली ती हृदयस्पर्शी आहे साक्षी मोरे एकएक मुद्दा मांडताना अक्षरशः उपस्थितांचे डोळे पाणावले होते असे विचार त्यांनी मांडले, माता रमाई बुद्धाच्या सिद्धांतानुसार आपलं जीवन जगल्या तोच आदर्श आपण डोळ्यासमोर ठेवून जीवन जगले पाहिजे असे मार्गदर्शन केले. सदर प्रसंगी बौद्धजन पंचायत समितीचे सरचिटणीस राजेश घाडगे, कार्याध्यक्ष लक्ष्मण भगत, कोषाध्यक्ष नागसेन गमरे, उपकार्याध्यक्ष एच. आर. पवार, मनोहर सखाराम मोरे, अतिरिक्त चिटणीस श्रीधर साळवी, विठ्ठल जाधव, यशवंत कदम, सिद्धार्थ कांबळे, तुकाराम घाडगे, अतुल साळवी, महेंद्र पवार, सिद्धार्थ कांबळे, विश्वस्त मंडळ, मध्यवर्ती कार्यकारिणी, सर्व शाखांचे पदाधिकारी, सभासद, महिला मंडळ, बौद्धाचार्य, बौद्धाचार्या, विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. सरतेशेवटी मनोहर बा. मोरे यांनी सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी अथक परिश्रम घेणाऱ्या सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

## सेवालयातील एचआयव्ही बाधित मुलांचे स्थलांतर थांबवण्यासाठी पुरोगामी



लातूर: लातूर जिल्ह्यातील औसा तालुक्यात असलेल्या हसेगाव येथील एचआयव्ही बाधित मुलांचे संगोपन करणाऱ्या सेवालय संस्थेत गेल्या कांही दिवसांपूर्वी एका अल्पवयीन एचआयव्ही बाधित मुलीवर बलात्कार झाल्याची तक्रार ढोकी पोलीस ठाण्यात दाखल झाली होती त्यानुसार ढोकी पोलिसांनी हे प्रकरण औसा पोलिसांकडे वर्ग केल्यानंतर औसा पोलिसांनी सेवालयचे प्रमुख रवी बापटले यांच्यासह चार जणांना अटक केलेली असून न्यायालयात या सर्व आरोपीना पोलीस कोठडी नंतर न्यायालयीन कोठडीत पाठवण्यात आलेले आहे., दरम्यानच्या काळात महिला बाल कल्याण विभागाने या प्रकरणाचा संदर्भ देत सेवालयातील ५० मुलांचे बीड आणि सोलापूर जिल्ह्यात स्थलांतर करण्याचं पत्र काढलंय, याला विरोध करत लातुरातील पुरोगामी विचारांच्या विविध संघटनानी गांधी चौकात आज ३ ऑगस्ट रोजी सायंकाळी ४ ते ६ या वेळेत धरणे आंदोलन केले. सेवालय आणि प्रा. रवी बापटले यांना बदनाम करून सेवालय बंद करण्याचं हे एक षडयंत्र असून सेवालयात आजही सर्व विध्यार्थ्यांचा नित्यक्रम व्यवस्थित असल्यामुळे सेवालयातील विद्यार्थ्यांचे स्थलांतर करू नये अशी मागणी यावेळी आंदोलनातील नेत्यांनी आपल्या भाषणातुन केली आहे.. या सोबतच कुठल्याही परिस्थितीत सेवालयातील विद्यार्थ्यांचे स्थलांतर होऊ न देण्याचा पवित्रा घेतला आहे. यावेळी अंधश्रद्धा निर्मूलन समिती, राष्ट्र सेवा दल,नारी प्रबोधन मंच, भारत जोडो अभियान, जी २४, समाजवादी जनपरिषदसह इतर पुरोगामी विचारांच्या विविध संघटनेचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने या आंदोलनात सहभागी झाले होते. प्रामुख्याने अंनिसचे राज्य अध्यक्ष माधव बावगे, अनिल दरेकर, रुक्सना मुल्ला, राष्ट्र सेवा दलाचे जिल्हाध्यक्ष पांडुरंग देडे, विजय चव्हाण, डॉ. सोमनाथ रोडे, अतुल देऊळगावकर, शिवाजीराव शिंदे, शैलजाताई बरूरे, सुनिताताई आरळीकर, सुमती जगताप, नरसिंग घोडके, दीपरत्न निलंगेकर, प्रा. सुधीर अनवले, सुधीर भोसले, हनुमंत मुंढे,प्रा.सुभाष भिंगे, दिलीप आरळीकर, डॉ. गणेश गोमारे,जितेंद्र तोडकर, रामकुमार रायवाडीकर, श्याम वरयांनी,डॉ. उतरेश्वर बिराजदार, ऍड. उदय गवारे, रामराजे आत्राम, डॉ. दशरथ भिसे, मच्छिन्द्र गोजने, , उत्तरेश्वर बिराजदार डॉ. बी. आर. पाटील, डॉ. कुसुम मोरे, ऍड. प्रदीप पाटील, शिवाजी कांबळे, ऍड. राजेश खटकें, प्रा. क्रांती मोरे, बाबा शेख हरिदास तमेवार, मछिंद्र गोजमे,आदिसह विविध पुरोगामी संघटनाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## गरसुळीचे कॉंग्रेस सरपंच अजय राठोड यांच्यासह अनेकांचा आ. रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वात भाजपात जाहीर प्रवेश



लातूर :- रेणापूर तालुक्यातील मौजे गरसुळी येथील कॉंग्रेस पक्षाचे सरपंच यांच्यासह विविध आजी-माजी लोकप्रतिनिधी व इतर अनेक जणांनी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वात रविवारी भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला.

लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांच्या उपस्थितीत झालेल्या या भाजपा पक्ष प्रवेश सोहळ्यास मंडळ अध्यक्ष शरद दरेकर, बाबासाहेब घुले, अनिल भिसे, श्रीमंत नागरगोजे, दिनकर राठोड, संतोष चव्हाण, धनंजय पवार, नारायण राठोड, उत्तम चव्हाण, रमेश चव्हाण यांच्यासह इतर अनेकांची उपस्थिती होती.

यावेळी आ. रमेशआप्पा कराड यांच्या उपस्थितीत गरसुळी येथील सरपंच अजय राठोड, माजी सरपंच तथा ग्राप सदस्य वाल्मीक घोडके, श्रीहरी बुवनर, संजय राठोड, सोसायटीचे सदस्य लहू घोडके, शेषेराव राठोड, वृषीकेत चव्हाण, भागवत कातळे, उत्तम कांबळे, वैजनाथ घोडके, प्रशांत चव्हाण, रामराव राठोड, नामदेव गुरुजी राठोड, विजय राठोड, लक्ष्मण चव्हाण, राजाभाऊ राठोड, कृष्णा राठोड, किशन घोडके, रुपेश घोडके, रामदास घोडके, बालासाहेब घोडके, शंकर घोडके, नागनाथ घोडके, अच्युत सरवदे, बालाजी चव्हाण, बाळासाहेब घोडके, हरीपाल घोडके, अंतराम चव्हाण, गोविंद सोमवंशी, नवनाथ वैद्य, बळीराम चव्हाण, मधुकर घोडके यांच्यासह इतर अनेकांनी भारतीय जनता पार्टी जाहीर प्रवेश केला.

ज्या विश्वासाने भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला त्या विश्वासाला कदापि तडा जाणार नाही अशी ग्वाही देऊन यावेळी बोलताना आमदार रमेशआप्पा कराड म्हणाले की, देशात नरेंद्रजी आणि राज्यात देवेंद्रजी यांच्या नेतृत्वातील शासनाने सर्वसामान्य माणसासाठी विविध योजना सुरू करून त्याचा प्रत्यक्ष लाभ देण्याचे काम केले आहे. लातूर ग्रामीण मतदार संघातील गावागावात वाडी वस्तीत शासनाच्या विविध योजनेच्या माध्यमातून लाखो नव्हे तर कोट्यावधीचा निधी उपलब्ध करून विकास कामांना गती दिली असून गरसुळी गावच्या विकासाला निधीची कमतरता पडू देणार नाही असेही त्यांनी बोलून दाखवले.

प्रारंभी मंडल अध्यक्ष शरद दरेकर, सरपंच अजय राठोड, वृषीकेत चव्हाण यांनी आपले मनोगत व्यक्त केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले तर शेवटी संतोष चव्हाण यांनी उपस्थितांचे आभार मानले. यावेळी गरसुळी ग्रामस्थांच्या वतीने आ. कराड यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. याप्रसंगी गरसुळी येथील भाजपाचे माजी सरपंच कुंडलिक घोडके, विठ्ठल गरड, धनंजय साळुंखे, तंटामुक्तीचे अध्यक्ष अरुण कातळे, प्रकाश राठोड, दिलीप कातळे, चंद्रकांत चव्हाण, नवनाथ चव्हाण, अनंत राठोड, ज्ञानदेव घोडके, बालासाहेब घोडके यांच्यासह इतर अनेक जण होते.

## चेतना क्लासेसच्या विद्यार्थ्यांचे प्रज्ञाशोध परीक्षेत घवघवीत यश!

लातूर - ५ जानेवारी २०२५ रोजी घेण्यात आलेल्या आय एम विनन राज्यस्तरीय प्रज्ञाशोध परीक्षेत चेतना क्लासेसच्या विद्यार्थ्यांनी जिल्हा, तालुका व केंद्र स्तरावर घवघवीत यश संपादन केले आहे. परीक्षेतील विविध गटांमध्ये चेतना क्लासेसचे विद्यार्थी पुढे सरसावले असून त्यांच्या कर्तृत्वाचा गौरव करण्यात आला आहे.

वर्ग ७वीतील यशस्वी विद्यार्थी:
दिग्विजय ढगे - जिल्ह्यात प्रथम क्रमांक
शाश्वती कल्याणे - जिल्ह्यात द्वितीय क्रमांक
सोहम साठे - जिल्ह्यात पंचम क्रमांक
आयमन शेख - तालुक्यात प्रथम क्रमांक

वर्ग ३रीतील यशस्वी विद्यार्थी:
सर्वेश लिंबूटे - जिल्ह्यात तृतीय क्रमांक
चेतना कल्याणे - तालुक्यात द्वितीय क्रमांक
सृष्टी देवणे - केंद्रात प्रथम क्रमांक
आलिया शेख - केंद्रात द्वितीय क्रमांक
आरोही भरबडे - केंद्रात तृतीय क्रमांक



वर्ग २रीतील यशस्वी विद्यार्थी:
आनंदी जाधव - जिल्ह्यात द्वितीय क्रमांक
वैभवी भोसले - जिल्ह्यात तृतीय क्रमांक
शिवम मिरकले - जिल्ह्यात चतुर्थ क्रमांक

या परीक्षेसोबतच इतर परीक्षांमध्येही चेतना क्लासेसच्या विद्यार्थ्यांनी आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. 'मंथन', 'चढ्ढ', 'ख-ड श्रेया' या नामवंत स्पर्धांमध्ये खालील विद्यार्थ्यांनी यश मिळवले: ₹ट्ट गोल्ड/सिल्वर मेडल विजेते व ट्रॉफी प्राप्त विद्यार्थी:

वर्ग ७वी:
शाश्वती कल्याणे - गोल्ड मेडल
सोहम साठे, तनुजा आरसुरे - उल्लेखनीय कामगिरी

वर्ग ३री:
चेतना कल्याणे - गोल्ड मेडल व ट्रॉफी
सृष्टी खुणे, आलिया शेख - ट्रॉफी विजेते
संस्कृती खुणे, मानसी कोते, शौर्य दरेकर - विशेष सहभाग

वर्ग २री:
वैभवी भोसले - गोल्ड मेडल व ट्रॉफी
आनंदी जाधव - गोल्ड मेडल व ट्रॉफी
आराध्या वाघमारे - गोल्ड मेडल
शिवम मिरकले - सिल्वर मेडल

इतर उल्लेखनीय विद्यार्थी: मधुरा चौधरी, गणेश जळगावकर, वीर दरेकर इत्यादी विद्यार्थ्यांनीही वेगवेगळ्या परीक्षांमध्ये यश संपादन केले आहे.

- - -

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा ट्रॉफी, मेडल व गुलाब पुष्प देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी चेतना क्लासेसच्या संस्थापक मॅडम स्वाती कल्याणे, संभाजी कल्याणे सर, जयश्री साठे मॅडम यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. स्वाती कल्याणे मॅडम यांच्या कुशल मार्गदर्शनामुळे आणि कठोर परिश्रमामुळेच हे यश शक्य झाले, असे पालकांनी नमूद करत मॅडमचे विशेष अभिनंदन केले.

- - -

ही यशोगाथा हेच संकेत आहे की योग्य मार्गदर्शन, चिकाटी आणि परिश्रम यामुळे कुठलाही विद्यार्थी यशोशिखर गाठू शकतो!

## लोकशाही दिनी नागरिकांच्या तक्रारींचे निवारण




लातूर/ प्रतिनिधी:- ऑगस्ट महिन्यातील पहिल्या सोमवार निमित्त दि. ४ ऑगस्ट रोजी महानगरपालिकेत आयोजित लोकशाही दिनी ८ तक्रारींचे निवारण करण्यात आले. यापैकी ६ तक्रारी वैयक्तिक स्वरूपाच्या तर २ सार्वजनिक होत्या.

मनपा आयुक्त श्रीमती मानसी, उपायुक्त डॉ.पंजाबराव खानसोळे, मुख्य लेखाधिकारी रावसाहेब कोलगणे, नागरी सुविधा केंद्र व लोकशाही दिन प्रमुख रंदावनी पवार यांच्यासह सर्व विभाग प्रमुखांची यावेळी उपस्थिती होती.

लोकशाही दिनी शेख सुलतान शमशोद्दीन, श्रीमती काशीबाई कोरे, माधव सूर्यवंशी, रोहिदास वाघचौरे, संतोष चंद्रे, रोहित शेटे, आकाश बाभळे व सुलेमान सय्यद यांनी तक्रारी अर्ज दाखल केले होते. क्षेत्रीय कार्यालय सी, मुख्य लेखा परीक्षक विभाग, क्षेत्रीय कार्यालय ए, पर्यावरण विभाग, क्षेत्रीय कार्यालय डी, अतिक्रमण विभाग, ई प्रशासन विभाग, विवाह नोंदणी व सामान्य प्रशासन विभागाशी संबंधित असणारे हे तक्रारी अर्ज संबंधित विभागाकडे वर्ग करण्यात आले. अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत तक्रारदारांचे म्हणणे ऐकून घेत त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्याचे आदेश मनपा आयुक्त श्रीमती मानसी यांनी दिले.

दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी होणाऱ्या लोकशाही दिनात नागरिकांकडून आलेल्या वैयक्तिक तक्रारीचे निराकरण केले जाते. नागरिकांनी आपल्या तक्रारी मांडून त्याची सोडवणूक करून घ्यावे, असे आवाहन आयुक्त श्रीमती मानसी यांनी केले आहे.

## धम्माचे आचरणच मानवाला दुःखातून मुक्त करेल ! भंते महाविरो थेरो

लातूर :- मानवाला- मानवाच्या दुःखातून मुक्त करण्याचा मुख्य मार्ग म्हणजे प्रत्येक मानवाने धम्माचे योग्य आचरण केले तर दुःखातून मुक्त होता येईल असे प्रतिपादन भंते महाविरो थेरो यांनी केले. वैशाली बुद्ध विहार बौद्धनगर लातूर येथे वर्षावास पुनित पर्वाच्या निमित्ताने आयोजित बौद्ध उपासक - उपसिका संस्कार शिबिरात ते बोलत होते.

यावेळी प्रथमतः तथागत भगवान गौतम बुद्ध व महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्प व पुष्पमाला अर्पण करून बुद्ध वंदनेने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी बोलतांना भंते पुढे म्हणाले की, दुःख हा भवरोग आहे आणि या दुःखातून बाहेर पडण्याचा मार्ग म्हणजे प्रत्येकानी धम्माचे योग्य आचरण करणे गरजेचे आहे. याच गोष्टीवर भगवान बुद्धांनी ४५ वर्षे भर दिला होता. मानवाचे दुःख हे त्याच्या अविद्येमुळे निर्माण होते.म्हणून मानवाने आपली अविद्या नष्ट करून आपल्या अंतःकरणात प्रज्ञा चक्षु निर्माण करणे हे समग्र मानव जातीचे नैतिक अधिष्ठान असावे. त्याचप्रमाणे परिवारिक व्यवस्था, सामाजिक व्यवस्था, एकसंघ राहावी यासाठी बुद्धांचा विशेष आग्रह होता. जो समाज पुन्हा - पुन्हा एकत्र येतो, एकत्र येऊन विचार विनिमय करतो, विचार विनिमय करून एक मुखाने निर्णय घेतो त्या समाजाला देशातील अथवा जगातील कोणतीही व्यवस्था हरवू शकणार नाही. हे बुद्धांनी विशेष रूपाने सांगितलेले आहे. जो माता-पित्यांची सेवा करतो तो आपल्या समाज बांधवांची सेवा निश्चित करतो, तोच व्यक्ती धम्मासाठी विशेष परित्याग करू शकतो.अन्यथा मातापित्यांचा गौरव न करणारे, परिवारासाठी, समाजासाठी, आणि पर्यायाने धम्मासाठी काहीच



करू शकणार नाहीत. पर्यायाने धम्माचा विकास होणार नाही असेही ते यावेळी बोलतांना म्हणाले. यावेळी आयुष्यमती लता चिकटे, लता गायकवाड, सविता चिकाटे,लता कांबळे,दिक्षा गायकवाड,मिना सुरवसे, ललीता मगर, आशा बानाटे,आयु.सुर्यभान लातूरकर,गौतम. चिकाटे, राजु कांबळे, उत्तम गायकवाड,भरत कांबळे,रामु कोरडे, महादेव गायकवाड, सेवानिवृत्त पोलीस अधिकारी कर्मचारी भिमाई संघाचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केशव कांबळे यांनी केले. भंतेजींच्या आशिर्वादाने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

## ग्रंथमित्र पुरस्कार विजेते सूर्यकांत जाधव यांचे जिल्हा ग्रंथालय अधिकाऱ्यांकडून अभिनंदन



लातूर : महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या वतीने देण्यात येणारा वर्ष २०२३ -२४ चा ग्रंथालय चळवळीतील उत्कृष्ट ग्रंथालय सेवक ( ग्रंथमित्र ) पुरस्कार औसा तालुक्यातील आलमला येथील स्वामी विवेकानंद सार्वजनिक वाचनालयाचे ग्रंथपाल सूर्यकांत कमलाकर जाधव यांना जाहीर झाला आहे. त्याबद्दल लातूरच्या जिल्हा ग्रंथालय अधिकारी श्रीमती वंदना काटकर - देशमुख यांनी सूर्यकांत जाधव यांचे अभिनंदन केले आहे. तसेच छत्रपती संभाजीनगरचे सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे यांसह अनेक मान्यवरांनी जाधव यांचे अभिनंदन केले आहे. डॉ. एस.आर. रंगनाथन उत्कृष्ट ग्रंथालय सेवक ( ग्रंथमित्र ) पुरस्काराचा वितरण सोहळा मंगळवार दि. १२ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी चार वाजता पाटकर सभागृह, एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, नाथीबाई ठाकरसी मार्ग, चर्चगेट, मुंबई येथे आयोजित करण्यात आला आहे. या पुरस्काराचे स्वरूप रोख २५ हजार रूपाने, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र असे आहे. सूर्यकांत जाधव हे मागच्या २७ वर्षांपासून सार्वजनिक ग्रंथालय क्षेत्रात ग्रंथपाल म्हणून कार्यरत आहेत. औसा तालुक्यात सार्वजनिक ग्रंथालय चळवळ वृद्धिंगत करण्याकामी त्यांचे मौलिक योगदान राहिले आहे. या पुरस्काराचे आणखी एक महत्वपूर्ण वैशिष्ट्य म्हणजे, स्वामी विवेकानंद वाचनालयाला राज्य शासनाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कार मिळालेला असून या वाचनालयाचे सचिव प्रभाकर कापसे यांनाही राज्यस्तरीय ग्रंथमित्र कार्यकर्ता पुरस्कार प्राप्त झालेला आहे. आता या वाचनालयाच्या ग्रंथपालांनाही उत्कृष्ट ग्रंथालय सेवक ( ग्रंथमित्र ) पुरस्कार घोषित झाला आहे. एकाच वाचनालयाने तीनही पुरस्कार पटकावण्याचा अनोखा विक्रम नोंदवला असून राज्यात एकाच वाचनालयाशी संबंधित संस्था, सचिव व ग्रंथपाल या तिघांनाही हा पुरस्कार मिळविण्याची किमया साधणारे हे एकमेव ग्रंथालय असावे. या पुरस्काराबद्दल सूर्यकांत जाधव यांचे जिल्हा ग्रंथालय निरीक्षक राजेंद्र कोरे, सुधीर आचार्य, हिरालाल पाटील यांच्यासह ग्रंथालय कर्मचारी परिषदेचे संस्थापक अध्यक्ष सदाशिव बेडगे, कर्मचारी विकास परिषदेचे मराठवाडा विभागाचे अध्यक्ष गंगाधर पोतंगले, उपाध्यक्ष विद्यासागर हणमंते, बालाजी कांगणे, श्रीधर स्वामी, संतोष करमले, जहांगीर सय्यद, वैशाली दुरुगकर, विकास चिरके , गिरीधर जंगाले, काशिनाथ बोडके, गुप्तलिंग स्वामी, मनिषा पाचंगे, नागनाथ नागरगोजे, मनोहर गायकवाड, तुकाराम सुगावकर, चंद्रकांत पौळ , शिवहार बिराजदार, कृष्णा पिंगळे, नागेश्वरी पांचाळ, हणमंत भव्हाळ , गोवर्धन पाटील, धनंजय वैजवाडे, चंद्रशेखर ढगे , अंगद पांचाळ, अरविंद उबाळे यासह अनेक मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE